cmyk

## संपादकीय

### आयोगाला बटीक करण्याची चाल

नवीन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे अमित शहा यांच्या मर्जीतले अधिकारी आहेत. गृहमंत्रालयात त्यांनी याआधी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली पार पाडल्या आहेत. काश्मिरातील कलम ३७० हटवण्यासाठी गृहमंत्रालयात जे विशेष डेस्क स्थापन करण्यात आले होते, त्याचे प्रमुख हेच ज्ञानेश कुमार होते. अयोध्या प्रकरणाची जबाबदारीही त्यांच्याकडेच होती.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०२ | सोमवार, दि.२४ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या खात्यात आज जमा होणार दोन हजार रुपये

## पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वाटपाला सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

**देशातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाची बातमी समोर आली आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता सोमवार (२४ फेब्रुवारी) शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. केंद्र सरकार देशातील शेतकऱ्यांना २२ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत करणार आहे. किसान सन्मान निधीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवली जाणार आहे.**



पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १८ वा हप्ता ऑक्टोबर २०२४ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला होता. आता या योजनेचा १९ वा हप्ता २४ फेब्रुवारी रोजी जारी केला जाणार आहे. पीएम किसान योजनेंतर्गत, शेतकऱ्यांना वार्षिक ६,००० रुपये दिले जातात, जे प्रत्येकी २,००० रुपयांच्या हप्त्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित केले जातात. ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०१९ मध्ये सुरू केली होती. तेव्हापासून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळत आहे. दरम्यान, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता हा सोमवारी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भागलपूर, बिहार येथून पीएम किसानचा १९ वा हप्ता जारी करणार आहेत. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज पान २ वर

## अतिशी मार्लेना दिल्ली विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

आम आदमी पक्षाने (आप) माजी मुख्यमंत्री अतिशी मार्लेना सिंग यांची दिल्ली विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्ती केली आली आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू होणाऱ्या विधानसभा अधिवेशनाच्या पार्श्वभुमीवर आपच्या विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कालकाजी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अतिशी यांनी यापूर्वी सप्टेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे.



दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपते सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी आप नेत्या आतिशी मार्लेना यांचे अभिनंदन पान २ वर

# तब्बल ४२ मराठा संघटना एकवटल्या!

## मराठा परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांनी १० मार्चपर्यंत वेळ द्यावा, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडणार



### ज्योतीताई मेटे सहभागी

शिवसंग्राम संघटनेच्या ज्योती मेटे या बैठकीत सहभागी झाल्या होत्या. त्या बैठकी विषयी त्यांनी सोशल मीडियातून माहिती देताना सांगितले आहे की, बैठकीला उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करत अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवस्मारक व्हावे यासाठीचा लढा आणि मराठा समाजाच्या सामाजिक समस्यांवर उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच सारथी या संस्थेमार्फत महिला व शेतकरी यांच्याकरिता सक्षमीकरणाचा उपक्रम राबवण्यात यावा असे मत बैठकीत त्यांनी मांडले.

### मनोज जरांगेंच्या भूमिकेला संघटनांचा विरोध

मनोज जरांगे पाटील हे उपोषण करतात मात्र सरकारशी वाटाघाटी करत नाहीत. त्यांच्या या भूमिकेमुळे समाजाचे नुकसान होत आहे. त्यामुळे उपोषणाला बसायचे पण सरकारची चर्चा करायची नाही त्यांच्या या भूमिकेला विरोध असल्याचा सूर बैठकीत सहभागी होण्याआधी काही मराठा नेत्यांनी आळवला. सरकारबरोबर वाटाघाटी करून प्रश्न सोडवले पाहिजेत, अशी भूमिका हवी, असे देखील काही नेते सांगत होते.

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**मराठा समाजाच्या परिषदेसाठी दहा मार्चपर्यंत मुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडू, असा इशारा मराठा संघटनांच्या वतीने राज्य सरकारला देण्यात आला आहे. लवकरच परभणीमध्ये मराठा समाजाची परिषद होणार आहे. सुरूवातीच्या टप्प्यात सरकारसोबत चर्चेला प्राधान्य दिले जाईल, मात्र दखल न घेतल्यास रस्त्यावरच्या लढाईचा मार्ग मोकळा असेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांना वगळून तब्बल ४२ मराठा संघटना एकवटल्या आहेत. या संघटनांची मराठी आरक्षणाच्या मागणीसाठी कोल्हापूरमध्ये मराठा आरक्षण परिषदेच्या अंतर्गत बैठक झाली.**

बैठकीत सहभागी झालेले मराठे नेते म्हणाले, मराठा समाजासाठी २५ वर्षांपासून अधिक काळ काम करणाऱ्या संघटना एकत्र आल्या आहेत. त्यांना व्यासपीठ नाही आणि मराठा समाजाच्या प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे पुन्हा मोठा पान २ वर

### हात उंचावून अकरा ठराव मंजूर

१) महाराष्ट्र शासनाने ओबीसी ममाजाला ज्या ज्या सोयी सवलती लागू केल्या आहेत. त्या जशाच्या तशा मराठा समाजाला सरसकट लागू कराव्यात. २) हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट, बॉम्बे गॅझेटनुसार महाराष्ट्र शासनाने अमंलबजावणी करावी. ३) महाराष्ट्रा मध्ये ओबीसी प्रमाणे एसईबीसी (मराठा समाज) प्रवर्गातील विद्यार्थीना प्रतिपुर्ती करावयाच्या इतर शुल्काबाबतची सवलत द्यावी. ४) महाराष्ट्रामध्ये कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा व तालूका पातळीवर समिती गठण करून या समितीमध्ये मराठा समाजाचे दोन प्रतिनिधींना समाविष्ट करून घ्यावे. ५) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणारे व परराज्यात शिकणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती योजना मराठा समाजाला लागू करावी. ६) महाराष्ट्रात ओबीसी प्रमाणे एसईबीसी प्रवर्गातील युवक युवती करीता मोटर वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना लागू करावी. ७) मराठा आंदोलकावर दाखल झालेले गुन्हे मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच शासन निर्णया यानुसार तपासून मागे घेण्यात यावेत. ८) मराठा समाजाला एसईबीसी प्रवर्गा अंतर्गत १०% आरक्षण लागू केले आहे. सद्या ते न्यायप्रविष्ट आहे. ते राज्य शासनाने न्यायालयामध्ये आपली वाजू भक्कम मांडून आरक्षण टिकवावे, ९) मराठा भुषण आण्णासाहेव पाटील आर्थिक विकास महामंडळ हे फक्त मराठा समाजाला लागू करावे. तसेच व्याज परतावा व इतर कर्ज प्रकरणे वेळेत पुर्ण करणेत यावीत. १०) अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवस्मारकाचे काम तातडीने चालू करण्यात यावे. ११) महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यात यावे.

## धनंजय मुंडेंचा राजीनामा मागणे चुकीचे – रामदास आठवले

**पंढरपूर । प्रतिनिधी**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येत धनंजय मुंडे हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कुठेही सहभागी असल्याचे दिसत नसल्याने त्यांचा राजीनामा मागणे चुकीचे आहे असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे.**



मंत्री रामदास आठवले हे रविवारी सोलापूर दौऱ्यावर असताना ते पंढरपूरमध्ये थांबले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना जोरदार फटकेबाजी केली. यावेळी त्यांनी रिपब्लिकन पक्ष महायुतीसोबत असताना राज ठाकरे यांची गरजच काय? असा टोला राज ठाकरेंना लगावला. ते पुढे म्हणाले की, वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे या दोघांचे संबंध चांगले असले तरी या खून प्रकरणात धनंजय मुंडे सामील नसल्याने त्यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याचा निर्णय अजित पवार किंवा धनंजय मुंडे यांनाच घ्यावा लागेल, असे सांगत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली.

# ..तर वाल्मिक कराडला अटक झाली नसती !

## अंजली दमानिया यांची पोस्ट चर्चेत

**बीड । प्रतिनिधी**

अंजली दमानिया यांनी त्यांच्या सोशल मीडिया एक्सवरून रविवारी (दि.२३) एक पोस्ट केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, ''धनंजय मुंडे माझे दैवत, वाल्मिक कराड माझे नेते, असे म्हणणारे बालाजी तांदळे यांना पत्र देऊन त्यांना बरोबर घेऊन, त्यांच्याच जवळच्या मित्रांचा, जे खुनाचे आरोपी आहेत, त्यांना घेऊन पोलिस शोध करू शकतात का



? जे पकडले गेले, ते ''मुद्दाम पकडवून, बळी दिले गेले'' ह्यात शंका आहे का''?, म्हणूनच कराड फरार राहू शकले आणि आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी दाखवले गेले की, पोलिसांचा तपास चालू आहे. जर प्रकरण लावून धरले नसते तर कराडला देखील अटक झाली नसती.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड आणि त्यांच्या पान २ वर

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना वाशी पोलिसांची मदत

## आ.सुरेश धस यांनी उघड केले धाराशिव कनेक्शन, आरोपींवर मकोका लावून सहआरोपी करण्याची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना पळून जाण्यासाठी धाराशिवमधील वाशीच्या पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मदत केली. नितीन बिक्कड यातील एक आरोपी आहे. या सर्वांची चौकशी होऊन स्वतंत्र मकोका लावावा किंवा सहआरोपी करावे, अशी मागणी आ.सुरेश धस यांनी केली असून, नवे आरोप करताना त्यांनी या हत्या प्रकरणात धाराशीव कनेक्शन असल्याचा दावा केला.**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. त्यांनतर राज्यातील वातावरण चांगलेच तापले. या घटनेला आता जवळपास अडीच महिने उलटले आहेत. त्यानंतर या प्रकरणी पोलिसांनी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडसह आठ जणांना मोक्का पान २ वर

## महिला दिनी राबवणार महिला शक्तीला समर्पित उपक्रम–नरेंद्र मोदी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मन की बातच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून रविवारी (दि.२३) देशवासियांशी संवाद साधला. मन की बातचा हा ११९ वा भाग असून, २०२५ मधील हा कार्यक्रमाचा दुसरा भाग आहे. या कार्यक्रमात पीएम मोदींनी विविध विषयावर भाष्य केले असून, महिलांविषयी खास उपक्रम देखील जाहीर केला आहे.**

मन की बात कार्यक्रमाच्या ११९ व्या भागात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''आपल्या संस्कृतीत मुलींचा आदर करणे सर्वात महत्त्वाचे आहे. पान २ वर

# महिला आयोग बरखास्त करा–सुषमा अंधारे

**मुंबई । प्रतिनिधी**

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महिला आयोग बरखास्त करण्याची मागणी केली आहे.**

अंधारे म्हणाल्या की, गेल्या पाच वर्षात ज्या महिला आयोगाचे अस्तित्व तीळ मात्रही जाणवले नाही. जो महिला आयोग फक्त आणि फक्त कार्पोरेट पाट्यांमधून वावरताना दिसला. त्याच्यावरून म्हणे महायुतीत ठिणगी पडतेय. मायाहो.. दादाहो.. महिला आयोग तिघांपैकी कुणाच्याही वाट्याला गेला तरी त्या पदावर बसणारी व्यक्ती बुद्धी, कायद्याचे ज्ञान, जनमानसात





## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिड: १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

# दहा मार्च रोजी मांडला जाणार राज्याचा अर्थसंकल्प

## अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून, विरोधक सरकारची कोंडी करण्याच्या तयारीत

**मुंबई । वृतसंस्था**

**विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत होणार आहे. हे अधिवेशन ३ मार्च ते २६ मार्च २०२५ या कालावधीत होणार आहे. तर विधानसभा आणि विधानपरिषदेत या दोन्ही सभागृहात १० मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. रविवारी विधानभवनात आयोजित विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.**

अधिवेशनाच्या कामकाजाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुती सरकार पुर्ण



करणार का, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत शनिवार ८ मार्च सार्वजनिक सुटीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहाणार आहे. तर १३ मार्च होळीनिमित्त कामकाजास सुटी देण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले आहे. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतरचे हे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुकी आधी सरकारने लाडकी बहीण योजना जाहीर केली होती. याशिवाय अनेक योजनांची घोषणा केली. त्यामुळे त्याचा थेट ताण राज्याच्या तिजोरीवर पडला होता. होणारा खर्च पाहता उत्पन्न आणि खर्च याचा ताळमेळ कुठेही जमत नाही. त्यामुळे विकासकामांसाठी काहीच निधी शिल्लक राहात नसल्याचे सध्याचे चित्र आहे. या विषयावरून सरकारला विरोधक या अधिवेशनात घेरण्याची दाट शक्यता पान २ वर

cmyk

अग्रलेख

# आयोगाला बटीक करण्याची चाल

नवीन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे अमित शहा यांच्या मर्जीतले अधिकारी आहेत. गृहमंत्रालयात त्यांनी याआधी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली पार पाडल्या आहेत. काश्मिरातील कलम ३७० हटवण्यासाठी गृहमंत्रालयात जे विशेष डेस्क स्थापन करण्यात आले होते, त्याचे प्रमुख हेच ज्ञानेश कुमार होते. अयोध्या प्रकरणाची जबाबदारीही त्यांच्याकडेच होती. त्याखेरीज अमित शहा हे ज्या सहकार मंत्रालयाचे मंत्री आहेत त्या मंत्रालयाचे सचिव म्हणूनही ज्ञानेश कुमार काम पाहात होते. त्यामुळे अमित शहा यांनी आपल्या मर्जीतला अधिकारी तेथे विनासायास नेमला आणि त्यामार्फत २२ निवडणुकांचा मार्ग प्रशस्त केला असे सांगितले जाऊ लागले आहे.

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीची घोषणा अत्यंत घाईत करण्यात आली. वास्तविक मुख्य निवडणूक आयुक्त निवडण्याच्या पॅनेलमधून सरकारने सरन्यायाधीश यांना वगळले आहे आणि त्यात केंद्र सरकारचे प्राबल्य राहील अशी रचना करण्यात आली आहे. या तरतुदींना आव्हान देणारी याचिका प्रख्यात कायदेतज्ज्ञ प्रशांत भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयात केली आहे. त्या याचिकेवरील सुनावणी तेथे प्रलंबित असतानाच मुख्य निवडणूक आयुक्त नेमण्यात आल्याची घोषणा सरकारने अधिसूचना काढून जाहीर केली. त्यामुळे ही घोषणा आणि मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार हे १८ फेब्रुवारीला निवृत्त होणार होते. त्यामुळे त्याच्या आधीच सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येणे अपेक्षित होते. १२ फेब्रुवारीला त्याची सुनावणी होणार होती पण ती पुढे ढकलली गेली आणि तेवढ्या अवधीत सरकारने डाव साधला आणि आपल्या मर्जीतला मुख्य निवडणूक आयुक्त नेमला, असा आरोप आता होतो आहे. मुख्य निवडणूक आयुक्त निवडण्याच्या समितीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी या तिघांचा समावेश आहे. यात विरोधी पक्षनेत्याची भूमिका केवळ नाममात्रच म्हणावी लागेल. कारण, दोन विरुद्ध एक असे बहुमत सरकारच्या बाजूला असल्याने सरकार म्हणेल तेच खरे ठरणारे आहे. मुळात या निवड समितीतून सरन्यायाधीशांना बाजूला करण्याचा जो निर्णय घेण्यात आला, त्यामागे नेमके काय इंगित असावे याचा अंदाज कोणीही बांधू शकतो. मुख्य निवडणूक आयुक्त नेमण्याची घाई करू नये असे या समितीच्या बैठकीत राहुल गांधी यांनी सांगून पाहिले. पण त्यांच्या सूचनेचा विचार होणे शक्यच नव्हते. त्यामुळे राहुल गांधी यांनी या निवड प्रक्रियेवर असहमती दर्शवून बैठकीतून सभात्याग केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर रात्री उशिरा ज्ञानेश कुमार यांची या पदावर नियुक्ती झाल्याची घोषणा करण्यात आली. आता ज्ञानेश कुमार यांना २६ जानेवारी २०२९ पर्यंत अवधी मिळणार आहे. या पाच वर्षांच्या अवधीत तब्बल २२ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे कामकाज त्यांच्या नेतृत्वाखाली होईल. या २२ राज्यांमध्ये भाजपने कधीच न जिंकलेल्या पश्चिम बंगाल, केरळ अशा राज्यांचा आणि त्याखेरीज उत्तर प्रदेश आणि बिहार या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यांच्या निवडणुका व्हायच्या आहेत. त्यासाठी सरकारला आपला हस्तक असलेला मुख्य निवडणूक आयुक्त या पदावर नेमायचा होता म्हणूनच त्यांनी ते काम घाईने केले, असा आरोप काँग्रेसकडून झाला आहे.

लोकशाही प्रक्रिया निष्पक्षपणे राबवण्यासाठी निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वाची असते. हा आयोग लोकशाही प्रक्रियेचा मुख्य कणा आहे. पण आपल्या मर्जीतला अधिकारी नेमून हा आयोगच आपला बटीक बनवण्याचा उद्योग बिनदिक्कतपणे केला गेला आहे हे या ठिकाणी स्पष्ट दिसते आहे. या आधीचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची भूमिकाही निष्पक्ष स्वरूपाची राहिलेली नव्हती हे असंख्य उदाहरणांवरून स्पष्ट होते आहे. विरोधकांनी निवडणूक प्रक्रियेत घेतलेल्या आक्षेपांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात राजीव कुमार आघाडीवर होते. अनेक प्रकरणात त्यांनी विरोधकांची मुस्काटदाबी केलेली दिसते आहे. महाराष्ट्रात अचानक ७० लाख मतदार कसे वाढले, या वाढीव मतदारांची नावे आणि पत्ते आम्हाला द्या अशी अधिकृत मागणी काँग्रेसकडून झालेली असतानाही असा डाटा आम्ही देऊ शकत नाही असे सरळ उत्तर देऊन ते मोकळे झाले. अनेक ठिकाणच्या निवडणुकांचा विषय हायकोर्टात गेल्यानंतर ईव्हीएम मशीनमधला डाटा काढून टाकण्याचा प्रकारही त्यांच्याच काळात झाल्याचे हरियाणात निदर्शनाला आले आहे. महाराष्ट्रात मार्कडवाडी येथे झालेल्या मतदानाबद्दल असमाधानी असलेल्या गावकऱ्यांनी बॅलेट पेपरवर मॉक पोल घेण्याचा प्रयत्न केला पण तो प्रयत्नही हाणून पाडण्यात आला, यामागेही निवडणूक आयोगाचा हात होता ही बाबही लपून राहिलेली नाही. असे सगळे आरोप होत असताना राजीव कुमार मात्र शेरोशायरी ऐकवून पत्रकारांची उत्तरे टाळत राहिले. अमित शहा यांच्या मर्जीतील असलेले नवे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे याच वाटेने जाणार काय, अशी धास्ती त्यामुळे आतापासूनच निर्माण झाली आहे.

## पुस्तके देण्यात मुख्याध्यापकांची अडवणूक: जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

### • पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी लक्ष घालण्याची गरज

जालना । प्रतिनिधी

**जिल्हा वार्षिक योजनेतून स्वामी इंटरप्रायजेस कोल्हापूर यांच्याकडून इयत्ता १ ते ८ च्या निवडक जि.प शाळेला प्रत्येकी १७० पुस्तके वितरण करण्यात येत आहेत. मात्र स्वामी इंटरप्राईजेस कोल्हापुर यांच्याकडून मुख्याध्यापकांना पुस्तके वितरणासाठी अडवणूक केली जात आहे. अशी तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली. तसेच या प्रकरणी जालन्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी चौकशी करावी.घनसावंगी तालुक्यातील ४० मुख्यध्यापकांना शाळेची पुस्तके घेऊन जाण्यासाठी अंबड येथील पंचायत समितीमध्ये संबंधित वितरकाने बोलून घेतले.**

घनसावंगी तालुक्याचे पुस्तके अंबड येथे वितरीत करून वितरकाने प्रवास खर्च वाचवला व शासनाची फसवणूक केली. याप्रकरणी मात्र मुख्यध्यापकांना स्वतः खर्च करा लागला . परंतु या प्रकरणी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने फक्त बघायचे भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी जालना यांच्या कार्यालयाकडून जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधरण २३-२४ अंर्तगत नाविण्यपुर्ण उपक्रमांव्दारे जिल्हा परिषदेच्या इयत्ता पहिली ते आठवीच्या प्राथमिक उच्च प्राथमिक शाळांना वाचनीय अभ्यासपूर्वक व मार्गदर्शन पुस्तके वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे याकरिता ठराविक शाळांची निवड करून १७० पुस्तकांचा संच वितरण करण्यात येत आहे या करिता स्वामी इंटरप्राइजेस कोल्हापुर यांची निवड करण्यात आली. मात्र वितरकाने स्वतःच्या गाडीचा खर्च वाचावा म्हणून घनसावंगी तालुक्यातील ४० मुख्यध्यापकांना शिक्षा व इतर साहित्य घेऊन जाण्यासाठी अंबड येथे यावे अशा सुचना दिल्या. जिल्हाधिकारी यांचा उपक्रम असुन मुख्यध्यापक यांनी वेळेवर अंबड येथे न आल्यास सदर पुस्तके मागे जातील असा दबाव मुख्याध्यापक वर टाकण्यात आला होता व त्यास मुख्याध्यापक जबाबदार राहील अशी धमकी दिली. त्यामुळे मुख्यध्यापकांना हस्तगत करण्यासाठी १०० ते १५० किलो मिटर प्रवास करावा लागला. या वितरणाची चौकशी करावी अशी मागणी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## कॉपीमुक्ती नावालाच ; बहुतांश परिक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना शाळेतून पुरवली जाते कॉपी?

सारणी । प्रतिनिधी

**सद्या इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गाच्या परिक्षा सुरु आहेत. परिक्षा केंद्रावर गार्डींगवर जरी दुसऱ्या शाळेचे शिक्षक नेमले आसले तरी केवळ फॉरमलीटी म्हणून हे शिक्षक हॉलवर थांबतात परंतु आतमध्ये कॉप्यांचा सुळसुळाट होत आहे.**

दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी आता मोठा बदल झाला आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या केंद्रासाठी केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षेशी संबंधित कर्मचारी हे त्या केंद्राव्यतिरिक्त अन्य शाळांमधून नेमले आहेत. कॉपी रोखण्यासाठी मंडळाने हे नवे धोरण अमलात आणले आहे. यामुळे परीक्षा केंद्रांवर निष्पक्षता आणि पारदर्शकता वाढावी यासाठी परिक्षा मंडळाने घेतलेला निर्णय हा फोल ठरला आसून केज तालुक्यातील बहुतांश परिक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट पहावयास मिळत आहेत. परिक्षा विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी जणूकाही कॉपी करण्यासाठी अधिकृत परवानगीच दिली आहे की काय ? अशी अवस्था परिक्षा केंद्रावर पहावयास मिळत आहे. परिक्षा विभागाने कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई करु आसे जरी सांगितले असले तरी तरी अद्याप एकाही विद्यार्थ्यांवर कारवाई झाल्याचे जाहिर झाले नाही. परिक्षा विभाग हतबल झाला की अर्थबल झाला ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## डेबुजी परिट समाज आणि गुरू शिष्य परिवाराचा जालन्यात आगळा वेगळा उपक्रम

जालना । प्रतिनिधी

**शहरातील नवीन जालना भागातील अमरधाम स्मशानभूमीत (शेरी) श्रमदानाच्या माध्यमातून कायापालट करून तेथे झाडे लावून, भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर सुंदर सुविचार लिहून तेथे छोटेसे शांतीवन उभारून अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना बसण्याची चांगली व्यवस्था केलेल्या संत गाडगेबाबा शांतीवनाचे लोकार्पण आज रविवारी (दि.२३) राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. डेबुजी परिट समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराच्या संयुक्त विद्यमाने छोटेखानी सोहळा स्मशानभूमीत साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा तसेच स्मशानभूमीत श्रमदान करून स्वच्छता राखणाऱ्या स्वच्छतादुतांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यानिमित्त स्मशानभूमीत रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ३० दात्यांनी रक्तदान करून मानवतावादी कार्यास हातभार लावला.अमरधाम स्मशानभूमीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा परीट समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष सुभाषराव वाघमारे हे होते तर बदनापूरचे माजी आ. संतोष सांबरे, प्रसिध्द कवयित्री संजिवनी तडेगावकर, प्रसिध्द साहित्यिक प्रा. बसवराज कोरे, पंडीतराव लव्हटे, परीट समाजाचे जिल्हाध्यक्ष किशोर आगळे, लोकमान्य शाळेचे मुख्याध्यापक विजय उबरहंडे, निलेश नन्वरे, श्रीमती करूण हिवाळे, श्रीमती उबरहंडे, डेबुजी समाज आणि गुरू शिष्य परिवारचे संस्थापक किशोर खंडाळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.**



संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त सकाळच्या सत्रात जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी दोन्ही परिवारातील ३० सदस्यांनी रक्तदान केले. त्यानंतर दुपारच्या सत्रात मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे श्रीमती मिना इंगळे, श्रीमती लता मेव्हणकर, मिना वाघमारे, किशोर खंडाळे, गणेश इंगळे, रमेश पैठणकर, हर्ष मेव्हणकर, अरूण सुरूसे यांनी स्वागत केले. त्यानंतर अरूण सुरसे, लक्ष्मण उजेड, मच्छिंद्र उजेड, शिवराज उजेड, दिनेश उजेड, योगेश वाघमारे, बळीराम मोरे, चंद्रशेखर ठाकुर, रामेश्वर फड यांचा आदर्श परिवार सदस्य म्हणून तर संत गाडगेबाबा शांतीवनात सुविचार अंकीत करणारे पेंटर तथा गायक शेख जमील यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना प्रसिध्द कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर यांनी खंडाळे गुरूजी यांच्या कार्याचे कौतूक करून स्मशानभूमीतील कार्य निष्काम असल्याचे सांगून सर्वांनी या कार्याला साथ देवून सातत्य टिकवून ठेवावे, असे आवाहन केले. माजी आ. संतोष सांबरे यांनी स्मशानभूमीतील या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे कौतुक करीत आपण आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच स्मशानभूमीत एखाद्या कार्यक्रमाचे भाषण करीत असल्याचे सांगितले. संत गाडगेबाबांच्या पंचसुत्रीचा सर्वांनी अंगिकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. बसवराज कोरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याची आठवण करून देत बाबा हे आपल्या आयुष्याची प्रेरणा असून आपल्या जडणघडणीत त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव असल्याचे ते म्हणाले. यावेळी अमरधाम स्मशानभूमीत नियमीत श्रमदान करून परिसर स्वच्छ राखण्यात मोलाची भूमिका बजावत असल्याबद्दल रमेश पैठणकर,रोषण इंगळे, सचिन शिंदे, सचिन शेलार, गणेश मेव्हणकर, नकुल राऊत, विवेक पाटील, रामदास हजारे, गणेश वाघमारे, निलेश नन्नावरे, संतोष रेगुडे यांचाही शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रास्तविक सुनिल ढाकरके यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गौतम मोरे यांनी केले तर योगेश मोरे यांनी आभार मानले. यावेळी अशोकराव खंडाळे,सुरेशराव वाघमारे, अशोकराव जाधव, अनिल खंडाळे,काशिनाथ मेव्हणकर, संतोष शिंदे, जगतकुमार घुगे,सुभाष घोडके, डिगंबर जाधव, संजय आगळे, बाबासाहेब उजेड,ज्ञानेश्वर निक्कम, सोमेश कोळी, अविनाश कुलकर्णी, प्रदीप देशपांडे, गोपाल शिंदे, जालिंदर लाड, बाबासाहेब ओळेकर, राजेश शेलार,अतुल खंडाळे, कल्पना पेंटेवाड,श्रीमती करुणा हिवाळे यांच्यासह डेबुजी समाज जालना आणि गुरू शिष्य परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्मशानभूमीत रंगली मैफल

एरव्ही स्मशानभूमी म्हटलं की, दुख व्यक्त करण्याची जागा असते, सहसा स्मशानभूमीत कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम घेतले जात नाहीत. परंतू डेबुजी समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराचे संस्थापक किशोर खंडाळे गुरूजी यांनी पुढाकार घेत सर्वांच्या सहकार्याने अमरधाम स्मशानभूमीतील पडीत असलेल्या जागेचे रूपांतर सुंदर अशा बागेत केले. अंत्यविधीला येणाऱ्यांसाठी बसण्याची निवांत जागा, चोहीकडे झाडे, शोभीवंत फुले, रंगरंगोटी केलेल्या भिंती, भिंतीवरील सुविचार, पशु पक्ष्यांसाठी दानापाण्याची सोय अशी सर्व व्यवस्था असलेल्या संत गाडगेबाबा शांतीवनाची उभारणी केली. या शांतीवनाच्या लोकार्पण प्रसंगी माजी आ. संतोष सांबरे यांनी सुंदर मराठी भावगीत, कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर यांनी सुंदर कविता आणि पेंटर शेख जमील यांनी गझल गावून स्मशानभूमीत जणू मैफलच रंगविली. सर्वांनी या मान्यवर कलावंतांना भरभरून दाद दिली.

## खेळ पैठणीच्या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### कड्याच्या शुभांगी देवकरने पटकावला प्रथम क्रमांक

आष्टी । प्रतिनिधी

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे शुक्रवारी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी सीने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा खेळ पैठणीचा या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक कडा येथील शुभांगी देवकरने पटकावला मानाची पैठणी,फ्रीज,सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप होते.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध उपक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.



श्याम धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांच्या राज्यभर गाजत असलेल्या होम मिनिस्टर 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी महिलांनी तळ्यात मळ्यात,उखाणे,फुगा फोडणे,फॅशन शो या सह अनेक गीतांवर ठेका धरत स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.अभूतपूर्व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल हजारोच्या संख्येने आलेल्या महिलांनी श्याम धस यांचे विशेष आभार मानले.शिवाय आकर्षक बक्षिसांची लयलूट यावेळी पहायला मिळाली.ज्यामध्ये प्रथम पारितोषिक म्हणून घरगुती वापराचे फ्रीज द्वितीय पारितोषिक एल. इ. डी. टीव्ही,तृतीय पारितोषिक कुलर,चतुर्थ पारितोषिक वॉटर फिल्टर,पाचवे पारितोषिक मिक्सर होते.ज्यामध्ये अनुक्रमे प्रथम येण्याचा मान कडा येथील शुभांगी गणेश देवकर यांनी द्वितीय शितल सतीश भोसले तृतीय काजल भाऊसाहेब भोजने चतुर्थ रोहिणी दिलीप जगताप तर पाचवे पारितोषिक जया परमेश्वर वारंगुळे यांनी पटकावले. शिवाय यामध्ये सहभागी झालेल्या तीनशे महिलांना आकर्षक स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या तर अनुक्रमे विजेत्या महिलांसह इतर दहा महिलांना पैठणीचे वाटप करण्यात आले.

## मनोज जरांगेंच्या ताफ्यातील वाहनाचा महिलेच्या दुचाकीला धक्का, नंतर महिलेला घरात घूसून मारहाण

बीड । प्रतिनिधी

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यातील एका वाहनाचा दुचाकीला धक्का लागला मात्र काही वेळातच सदर महिलेच्या घरात जाऊन अज्ञात तिघांनी धुडगूस घातला. एवढेच नाही तर महिलेला मारहाण देखील करण्यात आल्याची घटना बीड जिल्ह्यात घडली. महिलेच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला. दरम्यान, ज्या वाहनाचा दुचाकीला धक्का लागला ते वाहन मराठा आंदोलक गंगाधर काळकुटे यांचे आहे. ओबीसी महिलेच्या घरात घुसून धुडगूस घालणाऱ्या अज्ञात व्यक्तींना तत्काळ अटक करा अशी मागणी मराठा आंदोलक गंगाधर कळाकुटे यांची मागणी केली आहे.**

यासंदर्भात त्यांनी पोलिसांना निवेदन दिले आहे. सध्या बीड जिल्ह्यात सामाजिक स्थिती बिकट झालीय. या घटनेनंतर पुन्हा वाद पेटू नये यासाठी काळकुटे यांनी अज्ञात आरोपींना तत्काळ अटक करून घडलेली घटना स्पष्ट करावी अशी मागणी केली आहे. मस्साजोगला परवा जयंतीच्या कार्यक्रमासाठी चौसाळ्याच्या दिशेने जात असताना कचारवाडीच्या जवळ मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यातील गाडीचा एका महिलेच्या दुचाकीला कट बसला . ही गाडी मराठा आंदोलन गंगाधर काळकुटे यांच्या नावावर आहे .संतापलेल्या महिलेच्या मुलाने ताफ्यातील गाड्या अडवल्या .दुचाकीला धक्का लागल्यावरून महिलेमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाली .मात्र काही वेळातच सदर महिलेच्या घरात जाऊन अज्ञात तिघांनी धुडगूस घालत महिलेला मारहाण केल्याची घटना घडली .याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .ज्या अज्ञातांनी महिलेला मारहाण केली त्या अज्ञातांना तात्काळ पकडून अटक करावी अशी मागणी गंगाधर काळकुटे यांनी केली आहे . या संदर्भातील निवेदनही त्यांनी पोलिसांना दिले आहे .या अज्ञातांना मराठा वंजारी वाद लावायचा होता का असा प्रश्न काळकुटे यांनी उपस्थित केला .मनोज जरांगेंच्या ताब्यात कोण्या अज्ञात आला गोंधळ करायचा होता का अशीही शंका काळकुटे यांनी उपस्थित केली .या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे .अज्ञातांना शिक्षा झाली पाहिजे असेही काळकुटे म्हणाले .महिलेच्या दुचाकीला ज्या वाहनाने कट बसला ते वाहन गंगाधर काळकुटे यांच्या नावावर आहे .

## पान १वरून...

### अतिशी मार्लेना दिल्ली

करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. ५ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकत तब्बल २७ वर्षानंतर दिल्लीतील सत्ता परत मिळवली. या निवडणूकीत आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि ज्येष्ठ नेते मनीष सिसोदिया यांच्यासह पक्षाच्या अनेक नेत्यांना या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला.

-------------

### शेतकऱ्यांच्या खात्यात आज जमा

सिंह चौहान यांनी शुक्रवारी ही घोषणा केली. पंतप्रधान २४ फेब्रुवारीला भागलपूर, बिहारमध्ये पीएम-किसानचा १९ वा हप्ता जारी करतील. एकूण २२,००० कोटी रुपये थेट ९.८ कोटी पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाठवले जातील.

**आतापर्यंत ३६ हजार रूपये जमा**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना केंद्र सरकारच्या कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून चालवली जाते. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये दिले जातात. आतापर्यंत देशातील शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचे १८ हप्ते (३६००० रुपये) मिळाले आहेत. आता पीएम किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता शेतकऱ्यांना लवकरच मिळणार आहे.

-------------

### तब्बल ४२ मराठा

एल्गार करण्यासाठी एकत्र आलो आहोत. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही आमची मुख्य मागणी आहे. या परिषदेमध्ये मराठा आरक्षणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सुरुवातीला सरकारशी संवाद साधू जर सरकारने प्रतिसाद दिला नाही तर आंदोलन छेडू असा निर्णय घेण्यात आला. कोल्हापुरात झालेल्या या परिषदेमध्ये १० टक्के मराठा आरक्षण मिळावे या मागणीवर ठामपणे चर्चा झाली. तसेच हात उंचावून अकरा ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये ओबीसी प्रवर्गातील ज्या सोयी सवलती आहेत त्या मराठा समजाला आहे तशाच लागू कराव्यात हा मुख्य मुद्दा या बैठकीमधून पाहायला मिळाला.

------------

### संतोष देशमुख हत्या प्रकरणातील

लावला आहे. या प्रकरणातील एक आरोपी फरार आहे. त्याचा शोध घेतला जात असतानाच आता या प्रकरणात सुरेश धस यांनी केलेल्या आरोपामुळे मोठा ट्विस्ट आला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपीना पळून जाण्यास कोण मदत केली हे स्पष्ट करीत सुरेश धस यांनी या खून प्रकरणातील धाराशिव कनेक्शनच उघड केले आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, भाजप आमदार सुरेश धस यांच्या प्रमाणे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सरकारकडे वेगवेगळ्या मागण्या केल्या आहेत. त्यातच रविवारी एका कार्यक्रमानिमित्त धाराशिव जिल्ह्यात असलेल्या भाजप आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख खून प्रकरणातील धाराशिव कनेक्शन उघड केले. या प्रकरणातील तपास अधिकारी सांगतात आरोपी जंगलातून पळून गेले. परंतु आरोपी जंगलातून पळून गेले नाहीत. ते वाशी शहरातून गेले आहेत. वाशी पोलीस ठाण्यामधील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी या आरोपींना फरार होण्यासाठी मदत केली, असा आरोप आमदार धस यांनी केला आहे.

----------

### ..तर वाल्मिक कराडला

काही साथीदारांना अटक करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण चांगलेच उचलून धरले आहे. मंत्री मुंडे यांनी मविआ सरकारमध्ये असताना कृषी खात्यात भ्रष्टाचार कसा केला यासंबंधी पुरावे देखील दमानिया यांनी वेळोवेळी उघड केले आहेत. रविवारी (दि.२३) त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत संतोष देशमुख हत्या प्रकरणी मुंडे आणि सरकारला सवाल करीत काही बाबी स्पष्ट केल्या आहेत. बालाजी तांदळे, जो जमिनीचा बंदोबस्त करतो, प्रत्येक स्थळी उपस्थित असतो. तो शोधेल आरोपींना? ह्याची नुसती चौकशी करून त्याला सोडून दिले? ह्याला जर थर्ड डिग्री वापरून चौकशी केली, तर कळेल सगळे कुणाच्या सांगण्यावरून होत होते. पीआय गोसावी आणि भागवत शेलार यांचे सीडीआर जाहीर करा. पहिल्या दोन आरोपींची टीप कुणाकडून आली ? देवेंद्र फडणवीस आता तरी काही बोलणार का अजून त्यांना गरज वाटत नाही?, असा सवाल देखील दमानिया यांनी एक्स पोस्टमधून सरकारला केला आहे.

--------------

### महिला दिनी राबवणार महिला

देशाच्या मातृशक्तीने आपल्या स्वातंत्र्यलढ्यात आणि संविधानाच्या निर्मितीतही मोठी भूमिका बजावली आहे. यावेळी महिला दिनी, मी एक उपक्रम हाती घेणार आहे जो आपल्या महिला शक्तीला समर्पित असेल. या खास प्रसंगी, मी माझे एक्स आणि इंस्टाग्राम सारखे सोशल मीडिया अकाउंट एका दिवसासाठी देशातील काही प्रेरणादायी महिलांना सोपवणार'' असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

------------

### दहा मार्च रोजी मांडला

आहे. त्याच बरोबर मंत्र्यांवर होत असलेले भ्रष्टाचाराचे आरोपही सरकारला त्रासदायक ठरत आहेत. धनंजय मुंडे हे विरोधकांच्या रडारवर असतील. त्याच बरोबर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपदही धोक्यात आहे. त्यांना शिक्षा होवूनही त्यांची आमदारकी रद्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे विरोधक आक्रमक होतील हे नक्की आहे. तानाजी सावंत यांचाही मुद्दा विरोधकांच्या हातात आहे. शिवाय महायुतीत सुरू असलेली अंतर्गत कुरबूरीवरून विरोधक सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याची शक्यता आहे.

----------

### महिला आयोग बरखास्त

जाऊन काम करण्याची तयारी या निकषावर थोडीच बसते? हे असले आयोग म्हणजे असून अडचण नसून खोळंबा आहे. तो कुणाच्या वाट्याला जाईल यावर वादावादी करण्यापेक्षा सरळ आयोग बरखास्त करून टाका, असे अंधाऱ्या म्हणाल्या.

----------------

**नावात बदल**

जुने नाव-धैर्यशील भागवतराव ठोंबरे
नवे नाव-धैर्यशील भागवतराव ठोंबरे
पत्ता-मु पो-दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड पिन-४३११२८

**CHANGE IN NAME**

Old Name-Dhairyashil Bhagwatrao Thombare
New Name-Dhairyashil Bhagwatrao Thombre
Address-A/P-Dindrud Tq-Majalgaon Dist-Beed Pin-431128.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५


## बीड जिल्हा वकील संघाचे स्नेहसंमेलन : मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ॲड.येवले यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.२५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार्या या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन वकील संघाचे अध्यक्ष ॲड.आर.डी. येवले यांनी केले आहे.



बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मंगळवार दि.२५ रोजी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाचे न्यायमुर्ती संतोष चपळगावकर व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांच्या हस्ते सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. यानंतर मान्यवरांच्या हस्ते क्रिडा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण होणार असून रात्री ८ वाजता जिल्हा वकील संघाच्या गायक कलाकारांनी सादर केलेल्या गीतांचा कार्यक्रम होणार आहे. दि.२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता दुसर्या दिवशीच्या कार्यक्रमांचा उद्घाटन सोहळा होणार असून ७ वाजता शेला पागोटे कार्यक्रम होणार आहे. यानंतर ८ वाजता नाटक व शॉर्ट फि ल्म सादरीकरण केले जाणार आहे. दि.२७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर व पोलिस अधिक्षक नवनित कांवत यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार असून सायंकाळी ७ वाजता संगीत रजनी व त्यानंतर स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा वकील संघ अध्यक्ष ॲड. आर.डी.येवले, सचिव ॲड. यासेर पटेल व पदाधिकारी यांनी केले आहे.

# संकल्प विद्या मंदिर शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणातून करतेय समाजबांधणी - डॉ.विठ्ठलराव लहाने

### संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सुवर्णरत्न पुरस्काराने शिवकुमार निर्मळे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, वर्षाताई मुंडे आणि विद्याधर पंडित सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या सुवर्णरत्न पुरस्कारांचे वितरण यावर्षी शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. यावर्षी हे पुरस्कार शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (सामाजिक), वर्षाताई मुंडे (शिक्षण) आणि विद्याधर पंडित (कला) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.**

शनिवारी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात पुरस्कार वितरणाचा अत्यंत दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना डॉ.विठ्ठलराव लहाने म्हणाले की, अंबाजोगाई शहर हे सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. माझे शिक्षण या शहरात झाले आहे. संकल्प विद्या मंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी सभागृहात उपस्थित पालकांची गर्दी पाहून लक्षात येते की, शिक्षण क्षेत्रात चोले दांम्पत्य हे अत्यंत तळमळीने कार्य करीत आहे. असे सांगून त्यांनी पालकांनो आपल्या घरात शैक्षणिक वातावरण निर्माण करा. विद्यार्थ्यांना कष्टाची, स्वयं अभ्यासाची सवय लावा, त्यांच्यात प्रामाणिकपणा पेरा, इमानदारी शिकवा. त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, कष्ट, मेहनत या गुणांना प्रोत्साहन द्या. घरातील टि.व्ही.बंद करा, मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा. त्यांच्यात शिक्षणाविषयी आवड निर्माण करा. आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी वेळ द्या, कुटुंबात परस्परात संवाद, समन्वय ठेवा, स्नेहबंध वाढवा, आपसांत भांडणे करू नका. घराचे घरपण कायम ठेवा. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संकल्प विद्या मंदिर शाळेचा भविष्यात वटवृक्ष व्हावा अशा शुभेच्छा डॉ.लहाने यांनी दिल्या. उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.नरेंद्र काळे म्हणाले की, अंबाजोगाई हे शिक्षणाचे माहेरघर आहे. जेवढा शिक्षक चांगला, तेवढी शाळा चांगली. चांगल्या शिक्षकांवरच शाळेचे यश अवलंबून असते. शाळेचा मालक हा संस्थाचालक व शिक्षक असल्यानेच त्यांच्या दूरदृष्टी व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे संकल्प विद्या मंदिर शाळेने अल्पावधीत शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शाळा अशी स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आज शाळा चालविणे व विद्यार्थी मिळविणे ही अवघड बाब आहे. तशाही



परिस्थितीत विविध उपक्रम राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम संकल्प विद्या मंदिर शाळा करीत आहे. अंबाजोगाईच्या शैक्षणिक परंपरेला ते पुढे नेत आहेत असे डॉ.काळे म्हणाले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण व मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठलराव लहाने (लातूर) हे होते. तर उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था) हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (माजी नगरसेवक, न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी, अंबाजोगाई), अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय, लातूर), ॲड.राजेंद्रप्रसाद धायगुडे, संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास चोले, मुख्याध्यापिका रेखाताई बडे हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी वृक्षमित्र सुधाकर देशमुख (समाजसेवा), शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वर्षाताई मुंडे (शिक्षण) आणि प्रख्यात चित्रकार विद्याधर पंडित (कला) या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सुवर्णरत्न पुरस्कार-२०२५ देवून सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, फेटा, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ असे होते. सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंभीरे यांनी केला. तर प्रारंभी कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. दीपप्रज्वलनानंतर नारळ वाढवून ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी देवीचे प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतपर गीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थितांना शाळेच्या प्रगतीचा चढता आलेख मांडणारा माहितीपट दाखविण्यात आला. प्रास्ताविक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका रेखाताई बडे यांनी केले. तर यावेळी स्कॉलरशिप करीता पात्र ठरलेल्या प्रगती सुधाकर केंद्रे, आरोही उत्तरेश्वर बनाळे, श्रावणी ओमप्रकाश कांगणे, सानिध्या ओंकार स्वामी, पृथ्वीराज तात्याराव निकम, प्रतीक कैलास जाधव या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या विविध विभागप्रमुखांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शेख मुख्तार यांच्याकडून संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास चोले आणि मुख्याध्यापिका रेखाताई बडे यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच संकल्प विद्या मंदिर शाळेच्या स्नेहसंमेलनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तब्बल ३१ विविध लोकप्रिय हिंदी आणि मराठी गीत प्रकारांतून आपला बहारदार कलाविष्कार सादर केला. आणि उपस्थित मान्यवर, पालक वर्गाची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रिया नायक यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती प्रिया घाडगे यांनी मानले. या पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा सुभाष बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती अनिता कुलकर्णी, श्रीमती प्रिया घाडगे व संकल्प परिवाराच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. यावेळी राजकीय, सामाजिक, शिक्षण, विधी, पत्रकारीता, उद्योग, क्रीडा, कृषी, सांस्कृतिक, साहित्य, कला आणि संगीत क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तर आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृह पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने तुडुंब भरले होते. वंदे मातरम्? ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कुळवाडी भूषण रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री संत गजानन अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विवेक घोबाळे यांच्या अध्यक्षतेखाली कुळवाडी भूषण, रयतेचा राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते शिवश्री बालाजी शेरेकर यांनी ''शिवकालाचे खरे अंतरंग'' या विषयावर मांडणी करत प्रामुख्याने शरद जोशी यांच्या शेतकऱ्यांचा राजा छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले यांचा महाराजांवरील दिर्घ पोवाडा, द मॅनेजमेंट गुरु छत्रपती शिवाजी महाराज, रयतेचे राजे शिवाजी महाराज, कॉ. गोविंद पानसरे सर यांच्या शिवाजी कोण होता? कृष्णराव अर्जुन केळुसकर लिखित शिवाजी महाराज तसेच नरहर कुरुंदकर यांनी महाराजांवरील विविध लिखाण व व्याख्यान असे विविध संदर्भ देत मांडणी केली. ते पुढे बोलताना म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज घडवण्यामागे जिजाऊंचा असंख्य त्याग आणि समर्पण होतं. खरंतर रयतेच्या स्वराज्याची मूहर्तमेढ जिजाऊ या शब्दात सामावलेली दिसते जि- जिज्ञासा, जा- जागृती, ऊ- उत्कर्ष अशा त्रिरत्नांनी उमगलेलं स्वराज्याचं पहिलं पाऊल म्हणजे माँ जिजाऊ. ज्या पद्धतीने जिजाऊंवर



संस्कार झाले अगदी त्याच पद्धतीने शिवबावर संस्कार केले. आणि मूठभर मावळ्यांच्या सोबत स्वराज्याची स्थापना केली. असे विविध संदर्भ सहित उदाहरणे देऊन शिवचरित्र डोळ्यासमोर उभे केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घोबाळे सरांनी अध्यक्षीय समारोपात छत्रपती शिवरायांनी स्वराज्य मिळवून दिलं पण ते टिकून ठेवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान या भारत देशाला दिलं यापुढे प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे की, हे स्वराज्य लोकशाही मजबूत खांबाप्रमाणे न डगमगता कसं टिकून ठेवता येईल यासाठी अथक प्रयत्नांची गरज वाटते. या आधुनिक युगात शिक्षकांनी आपल्या अध्यापनाच्या ज्ञानपेरणीतून शिवबा, महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, भगतसिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे ज्यांच्या विचाराचे खरे व प्रामाणिक वारसदार तयार केले पाहिजे. शिक्षक केवळ विद्यार्थीचं घडवत नसतो, तर तो देशाचं नव्हेतर अखिल जगाचं भवितव्य घडवत असतो. आज युगात तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जे शक्य नाही ते शक्य होत आहे. याचा सुयोग्य वापर करून छात्र अध्यापकांनी प्रभावी अध्ययन-अध्यापन करावे. वाचनासाठी मूळ संदर्भ ग्रंथांना प्राधान्य द्यावे. जेणेकरून आपल्या ''बुद्धी व विचारांचा आवाका समुद्राप्रमाणे वाढायला हवा'', एकवेळ ''पोटाची भूक कमी अधिक प्रमाणात मिटेलही परंतु वाचनाची व विचारांची भूक ही कायम असावी!'' आणि ती कधीही मिटता कामा नये. असे प्रतिपादन केले. तसेच या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील सभागृहास ''छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य सभागृह'' हे नाव देऊन संस्थेच्या लवकिकतेत भर करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छात्र अध्यापक विद्यार्थ्यांनी रांगोळी, प्रबोधनपर गीत, भाषणे इत्यादी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी महाविद्यालयातील प्रा. अनिल बांगर, ग्रंथपाल सचिन गायकवाड, लिपिक श्रीपाद कुलकर्णी, प्राध्यापक, कर्मचारी व छात्रअध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापक रोहिणी यादव व नमिता झिरमिरे, स्वागत गीत संध्या जाधव तर आभार रघुनाथ देशमुख यांनी केले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

## विद्युत कर्मचारी सहकारी पत संस्था पाटोदा येथे शिवजयंती उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित पाटोदा येथे १९ फेब्रुवारी वार बुधवाररोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

महवितरण चे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता आर. व्ही जाधव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी श्री घाडगे साहेब श्री कदम साहेब श्री चौरे साहेब श्री दळवी साहेब विधूत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या .चे .चेअरमन सुनील वाघमारे सचिव प्रभु सोपान जाधवर साहेब श्री अनपट साहेब श्री विर साहेब श्री काळे साहेब श्री आगलावे साहेब श्री हजारे साहेब श्री पवार साहेब श्री धुमाळ साहेब श्री शाहजी नाईकवाडे साहेब बोबडे साहेब श्री पवळ मेजर श्री वैभव नाईकनवरे . श्री देवडे मेजर श्री राईज मेजर श्री दौलत भाई सह सर्व संचालक मंडळ व संस्थेचे सभासद हजर होते . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक विष्णू नाईकवाडे व संगणक ऑपरेटर गुलाम माजेद शेख यांनी परिश्रम घेतले तर आभार सचिव जाधवर यांनी मानले यावेळी संचालक सभासद उपस्थित होते.



# बंडू खांडेकर हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व -गणेश गटकळ

दिंद्रुड। प्रतिनिधी

समाजसेवक, राजकारणी व पत्रकार या तीन वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांचा बंडूजी खांडेकर हे अभिनव मिलाफ आहेत. सकारात्मक पत्रकरिता करतांना देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना मदतीचा हात देऊन त्यांच्या जीवनामध्ये नवचैतन्य निर्माण करणारे बंडु खांडेकर हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन अभिनव पब्लिक स्कूलचे संस्थापक गणेश गटकळ यांनी केले. शिक्षक, पत्रकार व दीप मॅन्युफॅक्चरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.



माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा मूकनायक पुरस्कार दिंद्रुड येथील पत्रकार बंडू खांडेकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पार्श्वभूमीवर दीप मॅन्युफॅक्चरिंग, शिक्षक बांधव व पत्रकार संघाचे वतीने खांडेकर यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शरद कुलकर्णी होते. तर व्यासपीठावर मुख्याध्यापक आदिनाथ चांदबोधले, पांडुरंग कटारे, गणेश गटकळ, पत्रकार संघाचे मार्गदर्शक प्रकाश काशीद, अध्यक्ष अमोल ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संयोजकाच्या वतीने खांडेकर त्यांचा शाल, श्रीफळ व गौरवपत्र देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. मनोहर कटारे, संजीवनी राऊत व अमोल ठोंबरे यांच्या पुढाकाराने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सत्कारास उत्तर देताना बंडू खांडेकर म्हणाले की, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. शोषित व दबलेल्या समाजाचा बुलंद आवाज बनवलेल्या मूकनायक नावाने मला पुरस्कार मिळाला आहे, हे मी माझे भाग्य समजतो. सत्कार व पुरस्काराने माझी जबाबदारी आणखी वाढली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील गरजवंताला न्याय मिळवून देण्यासाठी यापुढेही प्रामाणिकपणे काम करु असा विश्वासही खांडेकर यांनी व्यक्त केला.यावेळी दिंद्रुड पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक, शिक्षक, पत्रकार यांची विशेष उपस्थिती होती. दीप मॅन्युफॅक्चरिंग युनिटमधील बहुसंख्य महिला कर्मचारी सत्कार समारंभास आवर्जून उपस्थित होत्या. पत्रकार संतोष स्वामी यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. सौ संजीवनी राऊत यांनी प्रास्ताविक तर मनोहर कटारे यांनी आभार मानले.

## वडवणी शहरांमध्ये संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

दि.२३ फेब्रुवारी रोजी गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनातून लोकांना मंत्रमुग्ध करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती वडवणी शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबांनी जनतेला भुकेलेल्यांना अन्न - तहानलेल्यांना पाणी, उघड्यानागड्यांना-वस्त्र, गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा अंध, अपंग रोगी यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दु:खी व निराशांना-हिंमत हाच खरा धर्म. ! अशी शिकवण देणारे संत गाडगे महाराज

यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव एका धोबी कुटुंबात झाला.संत म्हणून आपले जीवन जगण्यासाठी आपले कुटुंब सोडण्यापूर्वी त्यांनी आपल्या मनातून स्वयंसेवक म्हणून काम केले.

आपला ट्रेडमार्क झाडू घेऊन जात असे आणि टोपी घालत असे. जेव्हा ते गावात पोहोचायचे तेव्हा ते गावातील नाले आणि रस्ते स्वच्छ करायचे व गावकऱ्यांनी पैसे दिले तर ते समाजासाठी काहीतरी चांगले करण्या साठी वापरले जात असत राष्ट्रसंत गाडगे महाराज महाराजांनी मिळालेल्या पैशातून अनेक शैक्षणिक संस्था, धर्मशाळा, रुग्णालये, प्राणी निवारे सुरू केले आहेत. त्यांनी कीर्तनाचे वर्गही चालवले, बहुतेक कबीरांच्या दोहेतून समाजाला नैतिकतेचे धडे मिळतात. त्यांनी लोकांना साधे जीवन जगावे, धार्मिक कारणांसाठी होणारी जनावरांची कत्तल थांबवावी आणि दारूबंदीविरोधात मोहीम राबवावी, असे आवाहन केले. त्यांनी कठोर परिश्रम, साधे जीवन आणि गरिबांची नि:स्वार्थपणे समाजाची सेवा केली त्याबरोबरच महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने महाराष्ट्र ग्रामीण स्वच्छता अभियान राबवली त्याचबरोबर त्यांचे नाव महाराष्ट्रातील एका विद्यापीठाला सुद्धा मिळाले आहे.हा त्यांच्या कार्याचा गौरव आहे

पान ६ वरून...

## महिलेच्या घरावर हल्ला

जरांगे पाटील यांच्या ताफ्यातील माझ्या गाडीने कट मारल्याच्या कारणाने थोडा शाब्दिक वाद झाला होता आणि तो तेथेच संपला पण शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत महिलेला त्यानंतर त्यांच्या बीड शहरातील घरात घुसून तोडफोड आणि मारहाण करण्याचा गुन्हा आपल्या पोलिस स्टेशन मध्ये दोन दिवसापूर्वी दाखल झालेला आहे या प्रकरणातील जे अज्ञात आरोपी आहेत त्यांनी मुद्दामहून मराठा आणि वंजारी समाजात वाद लागावा म्हणून ही घटना केलेली असावी असा मला अधिक संशय आहे म्हणून जे कोणी अज्ञात आरोपी आहेत ते पकडण्यात यावेत यासाठी योग्य तो तपास करून संबंधित घराच्या परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यात यावेत तसेच आवश्यक असेल तर माझ्या स्वतःचे आणि माझ्या गाडीच्या चालकासह संबंधीत ताईच्या सोबत असलेल्या त्यांच्या चिरंजीव यांचे सुधा आवश्यक असतील त्या सर्वांचे कॉल डिटेल्स पण काढावेत जेणेकरून जे कोणी अज्ञात आरोपी आहेत ते तत्काळ पकडले जातील ही अपेक्षा आहे

तरी या सर्व प्रकरणातील सत्य बाहेर आणून अज्ञात दोषी आरोपींना शोधून तत्काळ कारवाई करावी अशी मागणी मराठा सेवक गंगाधर काळकुटे यांनी केली आहे

## सिरसाळा भूषण पुरस्कारासाठी

मागवण्यात येत आसून सामाजिक /शैक्षणिक /सांस्कृतिक / सेवा /आरोग्य सेवा /राजकीय /पत्रकारिता /कृषी/क्षेत्रात उल्लेखनीय

कार्य करणाऱ्या व्यक्तींना २२ मार्च २०२५ रोजी ''सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५'' ने सन्मानित करण्यात येणार असून या पुरस्कारासाठी १० मार्च २०२५ पर्यंत आपल्या प्रवेशिका यशराज पब्लिक स्कूल सिरसाळा या पत्त्यावर पाठवाव्या असे आवाहन श्री. जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष जनकल्याण बुउद्देशिय सेवाभावी संस्था वाघाळा व अध्यक्ष सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ निवड समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत गाडगे बाबांना अभिवादन : मानवलोकच्या पुढाकाराने सामाजिक उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मानवलोक जनसहयोग येथे संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले , यावेळी अंबाजोगाई तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार तुकाराम आरसूळ, तसेच मानव लोकचे अण्णासाहेब रोहम, अमन लोहिया, भागवत कांबळे, पत्रकार राहूल देशपांडे, दिलीप आडसुळ, निळकंठ देशमुख, बाळासाहेब केकान, राहुल कराड,गणेश राऊत, विलास जाधव, सचिन डोंगरे, सुभाष ताटे उपस्थित होते.



संत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर रंजल्या गांजल्या दिन दलित लोकांसाठी काम केले, त्यांनी खेडोपाडी फिरून समाज प्रबोधन करीत व गाव कसे स्वच्छ राहील यासंबंधी ते लोकांशी संवाद साधत असेल अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी खूप मोठे कार्य केले अशा थोर समाज सुधारकाची जयंतीचे औचित्य साधून मानवलोकने शहरातील मनोरुग्ण निराधार रस्त्यावर भ्रमंती करणाऱ्या भिक मागून उपजीविका भागवणाऱ्या जवळपास २५ जणांना पौष्टिक , रुचकर जेवण दिले तसेच व सध्या उन्हाळा चालू असल्यामुळे अनेक जणांकडे रस्त्यावरून चालत असताना पायात चप्पल नसते अशांना चप्पल चे वाटप करण्यात आले. उन्हाळा असल्यामुळे अनेक जण रस्त्यावर दिसून आले नाही त्यांनी एखाद्या सावलीच्या ठिकाणी कोपऱ्यामध्ये बसलेले दिसून आले. शहरांमध्ये चार-पाच राऊंड मारल्यानंतर हे सर्व व्यक्ती पर्यंत पोहोचू शकलो व त्यांना जेवणाचे डबे देऊ शकलो. जसे आम्ही जेवणाचे डबे देऊन पुढे सरकू लागलो व परत आम्ही त्याच रस्त्याने येऊ लागलो तेव्हा ज्यांना डबे देऊन गेलो होतो त्यांनी डबे खाऊन निवांत विश्रांती घेतली. सामाजिक उपक्रमाने गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.

## अभिनव पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलनात बालझुंबड

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी उत्साहात पार पडले. अबाल विद्यार्थ्यांनी विविध गितांवर सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. विद्यार्थ्यांची बाल झुंबड उपस्थितांची वाहवा मिळवत होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंढरी मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुरेश तिडके साहेब व उद्घाटक म्हणून दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि अण्णाराव खोडेवाड, सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश घायतिडक,विलास खाडे, बळीराम पारेकर, पत्रकार संतोष स्वामी,नवनाथ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती. शाळेचे अध्यक्ष अभिमान पारेकर यांनी शाळेचा वार्षिक प्रगती अहवाल मांडला. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच



अंगात असणाऱ्या विविध कला सादर करण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. मुलांच्या गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून अभिनव पब्लिक स्कूलने विविध प्रकारचे उपक्रम राबवल्याबाबत दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनी अण्णाराव खोडेवाड यांनी शाळेचे कौतुक केले. नवयुग बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष अभिमान पारेकर,उपाध्यक्ष गणेश लाटे,सचिव गणेश गटकळ सह शिक्षक सहकार्यांनी नवरत्न उत्सव २०२५ स्ननेहसंमेलन यशस्वी पार पाडले. श्री गणेश वंदना पासून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक गीतांवर याप्रसंगी विद्यार्थी उत्साहात थिरकले. उपस्थित पालकांनी टाळ्यांचा प्रतिसाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन बाळकिसन कटारे यांनी केले तर सूत्रसंचालन शाहनवाज शेख यांनी केले.

# राज्यात उन्हाळी कांद्यासह लाल कांद्याची मोठी आवक

## वेगवेगळ्या बाजार समितींमध्ये वेगवेगळे दर

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील बाजारसमित्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून उन्हाळी कांद्यासह लाल,पांढरा, नं १, लोकल, पोळ, हालवा, चिंचवड जातीच्या कांद्याची मोठी आवक होत आहे. पणन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात शनिवारी (२२ फेब्रुवारी) रोजी १ लाख ७ हजार ४४३ क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. अकोल्यात कांद्याला सर्वाधिक भाव मिळत असून ३००० रुपये क्विंटल सर्वसाधारण भाव मिळाल्याचे सांगण्यात आले. लासलगावात शनिवारी १२ हजार १९४ क्विंटल लाल कांद्याची आवक झाली. तर ३४९ क्विंटल उन्हाळी कांदा आला होता. शेतकऱ्यांना सर्वसाधारण २४०० रुपयांचा भाव मिळाला.**



राज्यातील कांदा बाजारात मागील काही दिवसांपासून मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहेत. २३ फेब्रुवारी रोजी राज्यात एकूण ६,४८१ क्विंटल कांद्याची आवक झाली असून, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या बाजार समित्यांमध्ये दर रू.५०० ते २,३५० च्या दरम्यान होते. २२ फेब्रुवारी रोजी राज्यातील एकूण आवक १,३७,४४३ क्विंटल होती. कोल्हापूर, नाशिक, पुणे, जळगाव आणि सांगलीमध्ये मोठ्या प्रमाणात कांदा दाखल झाला. नाशिकमध्ये उन्हाळी आणि लाल कांद्याचे दर ८२२ ते २,५९५ रूपया पर्यंत होते. तर, अकोल्यात कांद्याला २,५०० ते ४,००० पर्यंतचा उच्चांकी दर मिळाला. २१ फेब्रुवारीला आवक अधिक होती. २,५३,५४० क्विंटल कांदा बाजारात दाखल झाला होता. नाशिक, पुणे, सांगली आणि कोल्हापूरमध्ये सर्वाधिक व्यवहार झाले. मात्र, २३ फेब्रुवारीला आवक घटली असून, दर काही प्रमाणात कमी झाले आहेत.

# द्राक्ष पिकातील भुरी रोगाचे नियंत्रण



द्राक्ष पिकामध्ये अनेक बुरशीजन्य व जीवाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. यामध्ये मुख्यत: डाऊनी मिल्ड्यू, पावडरी मिल्डयू, अॅन्थ्रॅकनोज, जीवाणूजन्य करपा इत्यादी महत्त्वाचे रोगांचा सर्व द्राक्ष विभागात दिसून येतो. या रोगांमुळे मोठे नुकसान होते. या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या रोगांची ओळख असणे अत्यंत गरजेचे आहे. हा रोग बुरशीमुळे होतो.

ही बुरशी एक्टोपॅरासाइट असते. म्हणजे या बुरशीचे तंतू पानांच्या आतमध्ये न जाता वरील भागात राहतात. आणि झाडामधून अन्नद्रव्ये शोषण करतात. या रोगामुळे पिकाचे ३० ते ७५ टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. सर्व द्राक्ष वाणांवर आढळून येते. इतर पिकांवर ही प्रजाती दिसत नाही.

लक्षणे : रोगाची लक्षणे पाने, फळे, फांदी यावर दिसून येतात. सुरवातीला जुन्या पानांवर वरच्या बाजूने पिवळसर ठिपके दिसून येतात. नंतर या ठिपक्यांवर पांढरी ते राखेडी पावडर पडल्यासारखी वाढ दिसून येते. ही वाढ 'डाऊनी मिल्ड्यू' सारखी फुललेली नसून पानाला चिटकून असते. रोगाची तीव्रता जास्त असेल तर ही वाढ पानांच्या खालील बाजूस देखील दिसून येते. अशीच वाढ फळे आणि फांद्यांवर देखील दिसून येते.

पोषक वातावरण : हा रोग शक्यतो द्राक्ष हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात डिसेंबर नंतर आढळून येतो. पानांवर पाणी असल्यावर बिजाणुंचे अंकुरण होत नाही. यामुळे रोगाची लागण होण्यासाठी पाने कोरडी असणे आवश्यक असते. तापमान १० ते २० अंश सेल्सिअस, जास्त आर्द्रता अशी वातावरण स्थिती रोगासाठी अत्यंत पोषक असते. अशा वातावरणात बीजाणूचे अंकुरण चांगले होते. तापमान ३० अंश सेल्सिअसच्या पुढे आणि आर्द्रता ४० टक्के च्या खाली गेल्यास रोगाची लागण होत नाही.

नियंत्रणाचे उपाय : फांद्यांची खूप गर्दी नसावी. रोगग्रस्त पाने बागेबाहेर काढून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. रोगग्रस्त पाने बागेत टाकू नयेत. जमिनीवर ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची फवारणी करावी. जैविक बुरशी जसे की अॅम्पेलोमायसिस क्विसक्वॅलीस याची फवारणी रोगाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी किंवा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर करावी.

तसेच बॅसिलस सबटिलीसचा फवारणीद्वारे वापर करता येईल. पोटॅशिअम बायकार्बोनेटची देखील फवारणी घेता येते. पोषक वातावरणात शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर करावा. फवारणीसाठी पाणी मात्रा जास्त वापरावी (५०० ते ६०० लिटर)

फवारणीचे कव्हरेज चांगले होईल याची काळजी घ्यावी. शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर करावा. जास्त धोकादायक बुरशीनाशकांचा वापर तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यानंतरच करावा.

# भर उन्हाळ्यातील शेळीपालनाचे व्यवस्थापन

राज्यात अतिकडक उन्हाळा सुरु असून, अजूनही उष्णता आणि तापमान दोन्ही वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे जनावरांच्या विशेषत: शेळ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. कडाक्याचे उन्ह व दमट उष्णतेमुळे शेळीच्या दिनचर्यात खूप बदल होतो. त्यामुळे कडक उन्हाळ्यात शेळीची विशेष काळजी घेणे गरजेचे असते.

उन्हाळ्यात शेळ्यांचा आहाराची काळजी : वाढत्या उन्हामुळे शेळ्यांसाठी हिरवा चारा उपलब्ध होत नाही. असला तरी योग्य प्रमाणात नसतो. त्यामुळे शेळ्यांना आवश्यक पोषणतत्त्वे मिळत नाहीत. हवेतील उष्णता वाढल्यामुळे शेळ्यांच्या शरीरातील तापमानात देखील वाढते. त्यामुळे शेळ्यांना पाणी आणि हिरव्या चाऱ्याची गरज वाढते. बहुतांश शेळीपालक शेळ्या दिवसभर बाहेर चरून आल्यानंतर रात्री शेडमध्ये बांधून ठेवतात. या पद्धतीमध्ये जो चारा उपलब्ध आहे तोच चारा शेळ्यांना मिळतो. त्यामुळे आवश्यक असणारे पौष्टिक घटक शेळ्यांना मिळतीलच हे सांगता येत नाही. चांगला आहार न मिळाल्यामुळे शेळ्यांना पोषणतत्त्वांच्याअभावी बरेचसे आजार होतात. यामध्ये वजन कमी होणे, उष्माघात, मांस उत्पादन घटणे इत्यादी. या समस्या टाळण्यासाठी शेळ्यांच्या आहाराचे आणि आरोग्याचे योग्य व्यवस्थापन ठेवणे आवश्यक आहे.

कडक उन्हाळ्यात शेळ्यांची काळजी घ्यावी : १) शेळ्यांना झाडपाल्याची जास्त गरज असते. त्यासाठी शेळ्यांना दररोज पाच किलो हिरवा चारा, एक किलो वाळलेल्या चारा द्यावा. २) मांसवाढीसाठी पूरक घटक चाऱ्यामधून मिळत नाहीत. त्यामुळे चाऱ्यामध्ये क्षार मिश्रण, प्रतिजैविके मिसळून द्यावीत. ३) चाऱ्यासोबत विकरांचा वापर केल्यास चाऱ्याची पचनीयता वाढते. त्यामुळे शरीराला पौष्टिक घटक मिळून मांस उत्पादन वाढण्यास मदत होते.

४) प्रोबायोटिक्सच्या वापरामुळे ओटीपोटाला आवश्यक असणारे सूक्ष्म जीव मिळून पचनक्रिया जलद होते. यामुळे मांस उत्पादन वाढते तसेच शेळीची प्रकृती चांगली राहते. ५) आहारामध्ये क्षार मिश्रणाचा वापर केल्यास कमतरतेचे आजार कमी होऊन मांस उत्पादन वाढते. प्रतिजैविकाचा वापर केल्यास शेळीची रोगप्रतिकारक क्षमता वाढते व आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते. ६) उन्हाळ्यात ११ ते ४ या काळात भरपूर ऊन असते. उन्हामुळे शेळ्यांमध्ये उष्माघाताचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे शेळ्यांना सकाळी लवकर म्हणजे ६ ते ९ या वेळेस किंवा संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत चरण्यासाठी सोडावे. ७) चरण्यासाठी विनाकारण जास्त अंतर शेळ्यांना चालवू नये. शक्यतो उन्हाळ्यात गोठ्यातच चारा खाऊ घालावा. उन्हाळ्यात चाऱ्यासाठी दूरवर भटकंतीमुळे गरजेप्रमाणे पोषणतत्त्वे न मिळाल्यामुळे शेळ्यांची प्रकृती खालावते. ८) शेळ्यांना थंड, स्वच्छ पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे. २४ तास गरजेनुसार पाणी पिण्यासाठी उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी. ९) गोठ्यात पुरेशी जागा किंवा जास्त जागा उपलब्ध करून दिल्यास गोठ्यातील तापमानात वाढ होत नाही. त्यामुळे उकाड्याची तिव्रता कमी होते. गोठ्याभोवती उंच सावली देणारी झाडे असल्यास गोठ्यातील व गोठ्याभोवतीचे वातावरण थंड राहते.

१०) उन्हाळ्यामध्ये शेळ्यांच्या लेंड्यांपासून अमोनिया जास्त प्रमाणात बाहेर पडतो. त्यामुळे गोठ्यातील हवा खेळती राहणे आवश्यक आहे. ११) ज्या शेळ्यांचे केस लांब वाढलेले आहेत त्यांची उन्हाळ्यामध्ये कापणी करावी. त्यामुळे उकाडा कमी जाणवतो. १२) शेळ्यांना आंत्रविषार, लाळ्या खुरकूत आणि घटसर्प रागाचे लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण करणाच्या दोन दिवस आधी व नंतर इलेक्ट्रोलाइट पावडर, बी कॉम्प्लेक्स द्यावे.

यामुळे शेळ्यांवर लसीकरणाचा ताण पडत नाही.






### जागतिक दिवस

**१९१८ एस्टोनियाने (राष्ट्रध्वज चित्रित) रशिया पासून स्वातंत्र्य जाहीर केले.**

**जागतिक मुद्रण दिन**

**केन्द्रीय उत्पादनशुल्क दिवस**

### महत्वाच्या घटना

१६७०: राजगड येथे छत्रपती राजाराम यांचा जन्म
१८२२: जगातील पहिल्या स्वामीनारायण मंदिराचे अहमदाबाद येथे उद्घाटन झाले.
१९२०: नाझी पार्टीची स्थापना झाली.
१९२४: आजच्या दिवशी महात्मा गांधी यांची जेल मधून सुटका झाली.
१९१८: इस्टोनियाला (रशियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९३८: ड्यु पॉं कंपनीने नायलॉनचा दात घासण्याचा ब्रश विकण्यास सुरुवात केली.
१९४२: 'व्हॉइस ऑफ अमेरिका' या रेडिओ केन्द्राचे प्रसारण सुरू झाले.
१९४६: जुआन पेरोन हे अर्जेंटीना चे राष्ट्रपती म्हणून निवडल्या गेले.
१९५२: कर्मचारी राज्य विमा योजनेची सुरूवात झाली.
१९६१: मद्रास राज्याचे नाव बदलून तामिळनाडू असे करण्याचा सरकारने निर्णय घेतला.
१९८७: इयान शेल्डन या शास्त्रज्ञाने मॅगॅलेनिक नक्षत्रपुंजात '१९८७ ए' या तेजस्वी तेजोमेघाचा शोध लावला. तेव्हा तो पृथ्वीपासून १,६८,००० प्रकाशवर्षे दूर होता.
२००८: फिडेल कॅस्ट्रो ३२ वर्षांनी क्युबा च्या अध्यक्ष पदावरून निवृत्त झाले.
२०१०: एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात द्विशतक करणारा सचिन तेंडुलकर हा पहिला खेळाडू बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८३: बाबर यांचा जन्म
१६७०: राजाराम मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती, शिवाजी महाराजांचे चिरंजीव (मृत्यू: २ मार्च १७००)
१९२४: तलत महमूद पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा (मृत्यू: ९ मे १९९८ मुंबई, महाराष्ट्र)
१९३९: जॉय मुकर्जी चित्रपट कलाकार आणि दिग्दर्शक (मृत्यू: ९ मार्च २०१२)
१९४८: जे. जयललिता राजकारणी आणि दक्षिणेतील अभिनेत्री
१९५५: स्टीव्ह जॉब्ज ॲपल कॉम्प्युटर्सचा सहसंस्थापक (मृत्यू: ५ आक्टोबर २०११)
१९५९: राज्य सभेचे सदस्य अभिषेक सिंघवी यांचा जन्म.
१९६३: भारतीय चित्रपट दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांचा जन्म.
१९६६: राज्य सभेचे सदस्य उदयनराजे भोसले यांचा जन्म.
१९७२: भारतीय चित्रपट अभिनेत्री तसेच दिग्दर्शक पूजा भट्ट यांचा जन्म.
१९९४: सैराट मराठी चित्रपट अभिनेता आकाश ठोसर चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६७४: कोल्हापूरजवळील नेसरीच्या खिंडीत बहलोलखानाच्या फौजेवर हल्ला करताना सेनापती प्रतापराव गुजर व त्यांचे ६ सहकारी मारले गेले. या प्रेरणादायी घटनेवरच कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी 'वेडात मराठे वीर दौडले सात' हे काव्य लिहिले आहे.
१७६५: लिटिल ब्रिटन, पेनसिल्व्हानिया, यू. एस. ए.)
१८१०: हेन्री कॅव्हॅंडिश हायड्रोजन आणि आरगोन वायूंचा शोध लावणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १० आक्टोबर १७३१)
१८१५: रॉबर्ट फुल्टन अमेरिकन अभियंते व संशोधक, वाफेच्या शक्तीवर चालणारी जहाजे त्यांनी शोधल्यामूळे शिडाच्या जहाजांचे युग संपुष्टात आले. पाणतीराचा शोधही त्यांनीच लावला. (जन्म: १४ नोव्हेंबर)
१८१५: वाफ़ेवर चालणारे जहाज व पाणबुडी संशोधक 'रॉबर्ट फुलटोन' यांचे निधन
१९३६: लक्ष्मीबाई टिळक 'स्मृतिचित्रे' हे त्यांचे आत्मचरित्र मराठी साहित्यात अजरामर झाले आहे. (जन्म: ? ? १८६८)
१९३६: क्षयरोग निवारण दिन लक्ष्मीबाई टिळक स्मृतिदिन
१९७५: निकोलाय बुल्गानिन सोविएत युनियनचे अध्यक्ष (जन्म: ३० मार्च १८९५)
१९८६: रुक्मिणीदेवी अरुंडेल भरतनाट्यम नर्तिका (जन्म: २९ फेब्रुवारी १९०४)
१९९८: मराठी चित्रपट अभिनेत्री ललिता पवार यांचे निधन
२०११: अनंत पै ऊर्फ 'अंकल पै' 'अमर चित्र कथा' चे जनक (जन्म: १७ सप्टेंबर १९२९)
२०१८: प्रसिद्ध हिंदी अभिनेत्री श्रीदेवी यांचे निधन.

# पडीक जमिनीवर फळबाग लागवड करण्यासाठी घ्या सरकारी अनुदान


राज्यात फळबाग योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन फळ पिके व फुल पिके यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत समावेश करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत वैयक्तिक बांधावर, सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळझाड व फुलपीक लागवड करता येते. यामध्ये सलग फळबाग लागवडीअंतर्गत वैयक्तिक लाभार्थीला आंबा, चिकू, पेरू, डाळिंब, लिंबू, संत्री, सीताफळ, ड्रॅगनफ्रुट, अव्हाकडो, केळी, द्राक्ष आदि फळ पिकांची लागवड करता येते, तसेच, पडीक जमिनीवर लागवड आंबा, बोर, नारळ, सीताफळ आदि फळ झाडांची लागवड करता येते. तसेच गुलाब, मोगरा, निशिगंध आदी फुलझाडांची लागवड करता येते.

या योजनेत लाभार्थींनी क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर कमी जास्त करण्यास परवानगी आहे. परंतु देय अनुदान फळपीक लागवडीचे निकष विद्यापीठ शिफारसीनुसार अंतर मर्यादेतच देय राहते. अतिरीक्त कलमे रोपे यांचे अनुदान देय नसते. लागवड वर्षासह सलग तीन वर्षात मंजूर अंदाजपत्रानुसार अनुदान देय राहते. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायती वृक्ष पिकांच्या बाबत जे लाभार्थी कमीत कमी २० टक्के आणि कोरडवाहू वृक्षपिकांच्या बाबत किमान ७५ टक्के झाडे रोपे जिवंत ठेवतील, अशाच लाभार्थींना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

या पिकांना अनुदान : ड्रॅगनफ्रूट, अव्हाकॅडो, केळी, द्राक्ष, आंबा, चिकू, डाळिंब, बोर, सीताफळ, पेरु, कागदी लिंबु, मोसंबी, संत्रा, आवळा, कवठ, जांभुळ नारळ, चिंच, फणस, अंजीर, पानपिंपरी, शेवगा, काजू आदि फळ पिकांना तसेच गुलाब, मोगरा, निशिगंध या फुल पिकांना अनुदान दिले जाते.

लाभार्थी निवडीचे निकष काय आहेत? कमीत कमी ०.०५ हे. व जास्तीत जास्त २.०० हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहील. इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर कुळाचे नाव असेल तर योजना राबवत असताना कुळाची संमती आवश्यक आहे.

अल्प व अत्यल्प लाभार्थी, महिला लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती कुटूंब प्रमुख असलेल्या कुटुंबियांना तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, निरधिसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीस व पंतप्रधान आवास योजनेला प्राधान्य राहील. लाभार्थी शाश्वत उत्पन्नाची साधने उपलब्ध नसावीत. तसेच तो नोकरदार व्यक्ती नसावा. लाभार्थी ऑनलाईन रोजगार कार्डधारक असावा. लाभार्थीस ग्रामसभेची मंजुरी असावी व ग्रामपंचायत लेबर बजेटमध्ये त्याचा समावेश असावा व ग्रामसभेचा ठराव आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र इच्छुकांनी अधिक माहितीसाठी कृषि सहायक व तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.



# आमदार झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही- मोहन जगताप

## वडवणी येथे कार्यकर्ता मेळावा व नुतन जिल्हा अध्यक्ष सत्कार सोहळा

वडवणी । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या माजलगाव विधानसभा निवडणुकीमध्ये थोड्याफार मताने माझा पराभव झालेला असला तरी मी एक ना एक दिवस माजलगाव विधानसभेचा आमदार झाल्याशिवाय स्वस्त बसणार नाही व तुम्हा कार्यकर्त्यांनाही स्वस्त बसून देणार नाही असे विचार वडवणी येथे आयोजित केलेल्या प्रमुख कार्यकर्ता मेळावा व नूतन जिल्हाप्रमुख राजेंद्र मस्के यांच्या सत्कार सोहळ्या कार्यक्रमाच्या वेळी बोलताना माजलगाव विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते मोहन दादा जगताप यांनी मांडले.



वडवणी येथे काल दिनांक २२ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी ११ वाजता नगरपंचायत कार्यालय समोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या वडवणी तालुका प्रमुख कार्यकर्ता मेळावा व नूतन जिल्हाप्रमुख राजेंद्र मस्के यांच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी व्यासपीठावर माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहन दादा जगताप, सत्कारमूर्ती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, विधानसभा प्रमुख थावरे, बाजार समिती संचालक शेख शमशेरभाई, प्रदेश प्रवक्ते श्रीराम मुंडे, अँड भास्कर उजगरे, तालुका अध्यक्ष सुरेश भोरे यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रकाश जेधे सर यांनी केले यावेळी बोलताना जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के म्हणाले कि पक्षाचे जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील सर्व कार्यकारिणी बरखास्त करण्यात आलेल्या असून नवीन कार्यकारिणी निवडीची प्रक्रिया काही दिवसांत होणार असून यामध्ये नवीन, जुने पदाधिकारी, कार्यकर्ते यांना पदे देऊन पक्षवाढीसाठी संधी देण्यात येणार आहे तरी जे पदाधिकारी पक्षाशी बेमानी करतात त्यांनाही त्यांची जागा दाखवून देण्यात येणार आहे व जे पदाधिकारी कार्यकर्ते पक्षाशी इमानदार असून पक्षवाढीसाठी जे काम करतात त्यांना विविध स्तरावर पदे देऊन काम करणेची संधी देण्यात येणार आहे तसेच यावेळी अध्यक्षीय समारोप भाषणात बोलताना मोहन दादा जगताप म्हणाले की सर्व अठरा पगड समाजातील कार्यकर्त्यांना संधी देऊ सामावून घेतले जाईल व काम करणेसाठी संधी दिली जाईल तसेच येणाऱ्या काळात आता कार्यकर्त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका असून या निवडणुका पूर्ण दाखविणे कार्यकर्त्यांच्या पाठीशी राहून ताकदीने लढविल्या जातील तसेच जे पक्षाचे इमानदारीने काम करतात अशांना पक्षाच्या पदाच्या माध्यमातून काम करण्याची संधी दिली जाईल व जुन्या नव्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन सर्वांना पदे देऊन सामावून घेतले जाईल असे ते म्हणाले.यावेळी वडवणी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रमुख कार्यकर्ता मेळावा नूतन जिल्हा प्रमुख सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादीचे नेते महादेव जमाले यांनी केले होते यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवक तालुकाध्यक्ष इम्राण शेख, आप्पासाहेब जमाले,बंडु नाईकवाडे, सुग्रीव मुंडे, शहादेव लोंढे,खलील पठाण,इलियास पटेल, अशोक यताळ, निजाम शेख यासह अनेकांनी परिश्रम घेतले.यावेळी वडवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमोल राठोड यांनी केले.

# बालेपिर परिसरात रुग्णालय,क्रीडांगण व्हावे आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे मागणी



बीड । प्रतिनिधी

शहराचे विस्तारीकरण होत असून या भागातील नागरिकांना उपचार करण्यास जिल्हा रुग्णालय यावेळी लागत असल्याने बाले पीर परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र सह क्रीडांगण हवे अशी मागणी ही जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष खमरोद्दीन यांनी आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्याकडे केली आहे,

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की येथील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड घ्यावे लागत आहे प्रभाग क्रमांक ११ मधील रस्ते पूर्ण पणे उखडून गेले आहेत रस्त्यावरील खड्ड्यात गटारीचे घाण पाणी साचत आहे त्यामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे तसेच घंटागाडी येत नाही पिण्याच्या पाण्याची सोय बंद पडलेले पथ दिवे सुरू करावेत नियमित घंटागाडी पाठवून येथील कचरा उचलावा या भागातील अनेक नाल्या तूबल्या आहेत त्यामुळे या नाल्याचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने घाणीचे साम्राज्य पसरत आहे त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला आहे बीड शहराचे बालेपीर विभागात विस्तारीकरण होत असून अनेक वसाहती या परिसरात आहेत या भागात रुग्णालय नसल्याने येथील नागरिकांना उपचारासाठी शहरात यावे लागत आहे त्यामुळे या विभागात प्राथमिक आरोग्य केंद्रसह क्रीडा गण आदी सह नगरी सुविधा देण्याची मागणी एम डी खमरोद्दीन आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्या कडे निवेदनद्वारे केली आहे.

# जयभिम महोत्सवाच्या तयारीला सुरुवात

## नियोजन:पहिल्याचा बैठकीत जमा झाले पाच लाख



बीड। प्रतिनिधी

बीड शहराच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाने अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन दिला आहे.त्या अनुषंगाने यंदाचा जयभिम महोत्सव साजरा करण्यासाठी शनिवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती.सदरील बैठक बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.या निवड समितीच्या पहिल्याच बैठकीत तब्बल पाच लाख रुपये जमा झाले असून दीड महिना अगोदर जयभिम महोत्सवाच्या तयारीला सुरुवात झाली आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती, बीड सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून साजरी केली जाणार आहे. त्यासाठी महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.यावेळी विचार मंचावर

प्रा.प्रदीप रोडे, उत्तम पवार, अजय सवाई, बबन वडमारे, राजू जोगदंड, ॲड.भगवान कांडेकर, ॲड.राजू शिंदे, अरुणाताई आठवले, मायाताई मिसळे, अनिताताई डोंगरे आदी उपस्थित होते. या बैठकीत गेल्या वर्षीचा जमाखर्च मांडण्यात आला.तसेच सर्वानुमते २०२५ ची समिती जाहीर करण्यात आली. बैठकीच्या शेवटी विजय वाकोडे, सोमनाथ सुर्यवंशी, संतोष देशमुख दिपक अरुण यांना आदरांजली वाहण्यात आली.या महत्वपूर्ण नियोजन बैठकीचे संचलन प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले. यावेळी आंबेडकरी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या समितीत प्रमुख म्हणून प्रा.प्रदीप रोडे, गौतम चोपडे तर सदस्य म्हणून ॲड. भगवान कांडेकर,उत्तम पवार,ॲड.राजू शिंदे ,विजयकुमार समुद्रे, संतोष दिलीप गायकवाड, दयानंद सरपते, यशवंत कदम, ॲड.ओ.डी.गायकवाड, ॲड. नितीन वाघमारे, प्रा.डॉ.प्रेमचंद शिरसाट, किशोर गायकवाड, महादेव इंनकर, संतोष बामणे,विलास बामणे,सुमेध जोगदंड ,विकास वाघमारे,प्राचार्य प्रदीप गाडे, प्रा.डॉ.संजय कांबळे, वडमारे सचिन, प्रा.डॉ.उत्तम साळवे,ॲड.राजेश शिंदे यांचा समावेश आहे.

# महिला बचतगट भवनामध्ये राहणाऱ्या निराधार सरस्वती शिंदेना घरकुल मिळाले

## लिंबागणेश ग्रामपंचायत येथे प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र वाटप

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात काल दि.२२ शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळकृष्ण थोरात, दादा गायकवाड, श्रीहरी निर्मळ यांच्या उपस्थितीत गावातील एकुण १५७ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र वाटप करण्यात आले.आपल्या हक्काचे घर असावे,हक्काचा निवारा, घरकुल मिळवून देण्याचे काम प्रधानमंत्री आवास योजनेमुळे लाभार्थींचे घराचे स्वप्न साकार होणार असल्याने लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.



लिंबागणेश येथील सरस्वती माणिक शिंदे वय ६० वर्षे यांच्या पतीचे निधन ३० वर्षांपूर्वी झाले. मोलमजुरी करून मुलीचे पालनपोषण करून लग्न लावून दिले. २ वर्षांपूर्वी राहते मातीचे घर जमिनदोस्त झाले. त्यानंतर महिला बचतगट भवनात संसार थाटला.२ वर्षांपासून भवनात राहतात.रात्री लाईट नसल्याने १५ दिवसांपूर्वी घुशीने गालाचा चावा घेतला. अखेर काल ग्रामपंचायत कार्यालयात त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुरीचे प्रमाणपत्र मिळाले आणि अखेर त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटणार असल्याने चेह-यावर समाधान दिसून आले. घरकुल मंजुरी बाबतीत लाभार्थ्यांकडुन अवाजवी पैसे घेतल्याची ओरड एकीकडे होत असताना लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, दादासाहेब गायकवाड व बाळकृष्ण थोरात यांनी लाभार्थ्यांकडुन एकही रुपया न घेता शासन दरबारी फायली फिरवत स्वखर्चाने कागदपत्रे सुद्धा बनवली हि बाब कौतुकास्पद असुन याबद्दल ग्रामस्थांनी यांचे आभार मानले.

# लोकसाहित्याचे जतन होणे गरजेचे :डॉ. दिलीप गिऱ्हे

पाटोदा। प्रतिनिधी

विविध भाषेतील भारतीय साहित्याच्या जडणघडणीमध्ये लोकसाहित्याची भूमिका महत्वाची राहिलेली आहे. लोकसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून लोकसाहित्यातून समाजाची सभ्यता, संस्कृती, सामाजिक परंपरा जतन करण्याचे साधन आहे.बदलत्या काळात जनसामान्यांचे लोकसाहित्य अडगळीला पडत चालले आहे म्हणून लोकसाहित्याचे जतन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन परळी (वै.) स्थित नवगण कला व वाणिज्य महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख डॉ.दिलीप गिऱ्हे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने १८ फेब्रुवारी रोजी आयोजित अतिथी व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य प्रोफेसर.आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.नामदेव चांगण होते. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात बोलतांना डॉ. गिऱ्हे पुढे म्हणाले की, आपल्या देशात लोकसाहित्याची जुनी परंपरा आहे. त्यातून आपले जीवन मांडण्याचे कार्य झालेले आहे. त्या माध्यमातून समाजाची विविध क्षेत्रातील माहिती आपणास मिळालेली आहे, लोक साहित्याचा वारसा पुढे जतन करण्यासाठी साहित्य प्रेमी, स्वयंसेवी संस्था तसेच शासनाच्या वतीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी लोकसाहित्याचे महत्व मांडून आपल्या देशाच्या गौरवशाली साहित्याची परंपरा जतन करण्यासाठी लोकसाहित्याचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न होणे काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. न.पु.काळे यांनी केले तर आभार डॉ. कुशाबा साळुंके यांनी मानल. व्याख्यानास विद्यार्थी व प्राध्यापकांची उपस्थिती होती.

# मुस्लिम बहुल भागात सोयी-सुविधा सुरळीत करा-आ.संदीप क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी

पुढील महिन्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्येच पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. या अनुषंगाने बीड शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, स्वच्छतेची कामे लवकरात लवकर करून घ्या. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत.

यावर्षी पवित्र असलेला रमजान महिना मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच येणार आहे. पवित्र रमजान महिन्याच्या आगमनानंतर मुस्लिम बांधव पूर्ण महिनाभर कडक उपवास आणि अल्लाह ची उपासना करतात. त्यामुळे विविध सोयी सुविधा सुरळीतपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यामुळे शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने, पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वीच करून घ्यावेत अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत.

# ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तरुण वर्ग जोमात; बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासन कोमात

बीड। प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या दुर्दशेवर प्रथम निवेदन आणि नंतर बातम्यांच्या माध्यमातून प्रकाश टाकल्यावर ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तरुण वर्ग जोमाने कामाला लागला आहे. निवेदन देऊन १० दिवस उलटले तरी बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाकडून कारंजा टॉवर चे कुठलेच काम सुरू करण्यात न आल्याने ही दोन्ही कार्यालये अजूनही कोमातच असल्याचे दिसत आहे. दोन्ही कार्यालयांची अशीच अवस्था राहिली तर बीड शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवरची दैना दूर कशी होईल? आणि कधी? असे प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केले आहेत.







यावविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, ऐतिहासिक कारंजा टॉवर विषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेले निवेदन, त्यानंतर प्रसिद्धी माध्यमातून आलेल्या बातम्या बघून आता जनतेत कारंजा टॉवरच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण झाली आहे. याचाच परिपाक म्हणून टॉवर लगत सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले आहे. त्यावर आता लहान-मोठे आणि वयोवृद्ध नागरिक बसून आनंद घेत आहेत. शिवाय टॉवरच्या इमारतीसमोर लावण्यात येणारे भले मोठे अगडबंब बॅनर चे फ्रेम काढून टाकण्यात आले आहे. तसेच १० वर्षांपूर्वी कारंजा टॉवर समोर तयार करण्यात आलेल्या पाण्याच्या कारंज्याच्या हौदेतील प्रचंड गाळ, घाण, केरकचरा ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येत तरुणांनी श्रमदान करून काढला आणि हौदाची साफसफाई केली. आता टॉवरच्या पश्चिम आणि उत्तर बाजूस सिमेंटचे बाकडे टाकणे, पाण्याचे कारंजे सुरू करणे, दहा वर्षांपूर्वी टॉवरच्या चारही बाजूला लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करून सुरू करणे, बंद पडलेल्या तिन्ही बाजूच्या घड्याळी सुरू करणे, टॉवरच्या इमारतीला नुकसान पोहोचवू शकणाऱ्या दोन्ही मोठ्या झाडांच्या फांद्या छाटणे, टॉवरच्या इमारतीला आतून बाहेरून रंगरंगोटी करणे आदी कामे करणे आवश्यक आहे. कारंजा टॉवर विषयी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तरुण वर्ग जोमात आलेला असताना दुसरीकडे मात्र बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासन अजूनही कोमातच असल्याचे दिसून येत आहे. दोन्ही कार्यालयांची अशीच अवस्था राहिली तर बीड शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवरची दैना दूर कशी होईल? आणि कधी? असे प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केले आहे.

# शिवरायांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी पाच लाखांचा निधी उपलब्ध

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे मोठ्या जल्लोषात शिवरायांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. छत्रपतींच्या जयंतीच्या अगोदर सदरील पुतळा उभारण्यात आल्याने गावकऱ्यांसह परिसरातील शिवप्रेमी आनंदी आहेत. आणि यातच आता आणखीन आनंदाची भर पडली असून शिवरायांच्या पुतळ्याच्या शुशोभीकरणासाठी खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून पाच लक्ष रुपयांचा फंड बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी जाहीर केला आहे.



तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे शिवरायांचा पुतळा उभारल्यानंतर मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. आणि याचाच एक भाग म्हणून बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी शनिवारी दिनांक २२ फेब्रुवारी रोजी आनंदगाव येथे जाऊन शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन केले आणि शिवपूजनही करण्यात आले. यावेळी राहुल सोनवणे यांनी खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी पाच लक्ष रुपयाचा निधी जाहीर केल्याने गावकऱ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. सुशोभीकरणासाठी पाच लक्ष रुपये जाहीर केल्यामुळे आनंदगाव आणि परिसरातील गावकऱ्यांनी खासदार रजनीताई पाटील तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी आनंदगावच्या सरपंच अंजली गायकवाड, सारणीचे सरपंच संतोष सोनवणे, चेअरमन संजय गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मार्च अखेर ३२० ग्रामपंचायती हर घर जल घोषित करण्याचे उद्दिष्ट

## उद्दिष्ट पूर्तीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वय ठेवावा –मु.का.अ. आदित्य जीवने

बीड । प्रतिनिधी

येत्या मार्च २०२५ अखेर पर्यंत जिल्ह्यातील ३२० ग्रामपंचायती हर घर जल घोषित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून यासाठी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत होणारी सर्व कामे गुणवत्ता पूर्वक व्हावीत तसेच शंभर दिवस विकासाचे या उपक्रमात ३१ मार्च अखेर दिलेले उद्दिष्ट पूर्ण करताना सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक समन्वय ठेवणे गरजेचे असल्याचं मत मुख्यकार्य कारी अधिकारी आदित्य जीवने यांनी व्यक्त केलं. जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता कार्यशाळा तसेच संवाद बैठकीत हे बोलत होते .

या संवाद बैठकीला उपस्थित उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे, कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ तसेच साथ रोग वैद्यकीय अधिकारी डॉ.पी. के.पिंगळे यशदा प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षक प्रवीण खंडागळे जिल्ह्यातील सर्व





गटविकास अधिकारी तसेच उपाभियंता यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत ३२० ग्रामपंचायती हर घर जल घोषित करण्याचे उद्दिष्ट मार्च अखेर पर्यंत शासनाने दिले आहे तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ५७२ गावे ओडिएफ प्लस मॉडेल घोषित करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठरवून दिले आहे.

दोन्ही उपक्रमातील ग्रामपंचायती व गावे यांचे उद्दिष्ट दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ व काम करावे लागणार आहे. मात्र हे काम होत असताना गुणवत्तापूर्वक व्हावे याकरिता विशेष लक्ष देण्याची गरज असल्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या आहेत.

स्वच्छ भारत मिशन व जल जीवन मिशन उपक्रमात जिल्ह्यातील १३५० ग्रामपंचायतींचा समावेश आहे . आराखड्यात असलेली सर्व गावे त्यामध्ये आराखड्यात मंजूर असलेली कामे वेळेत पूर्ण करणे सर्वांची जबाबदारी असून सर्व उपविभागाचे उपअभियंता तसेच शाखा व कनिष्ठ अभियंता यांनी वेळापत्रक ठरवून कामांना भेटी देणे तसेच काम सुरळीत होण्यासाठी सूचना करणे महत्त्वाचे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितल आहे.घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनातील सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर ते सर्वांच्या हिताच्या दृष्टीने वापरात राहणे अत्यंत आवश्यक आहे.त्याकरिता देखभाल दुरुस्ती या उपक्रमात ग्रामपंचायतचा सक्रिय सहभाग असावा त्याकरिता सर्व पंचायत समिती स्तरावर अशा प्रकारच्या बैठकांचे आयोजन करण्याच्या देखील सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जिवने यांनी केल्या आहेत.

कचरा व सांडपाणी या विषयांमध्ये प्रवीण खंडागळे व संजय मिसाळ यांनी मार्गदर्शन केले. तर पाणी गुणवत्ता अभियाना संदर्भात भारत नागरगोजे, अमोल कुलकर्णी व गणेश खाडे यांनी मार्गदर्शन केले. जलजीवन मिशन या विषयावर कार्यकारी अभियंता व व्यापकॉस कंपनीचे हुले यांनी मार्गदर्शन केले. या संवाद बैठकीला जिल्ह्यातील सर्व सहाय्यक गटविकास अधिकारी सर्व शाखा व कनिष्ठ अभियंता विस्ताराधिकारी पंचायत ,सर्व गट व समूह समन्वय व अंमलबजावणी सहाय्य संस्था यांचे कर्मचारी उपस्थित होते.

### उद्दिष्ट पूर्ती होईल काय?

जलजीवन मिशन अंतर्गत येत्या मार्च अखेरपर्यंत हर घर जल अभियानांतर्गत ३२० गावांमध्ये प्रत्येक घराला नळाने पाणी मिळेल अशी व्यवस्था करायची आहे. याबरोबरच ५७२ गावे ओडिएफ प्लस म्हणजे संपूर्ण हागणदारी मुक्ती करायची आहे. मात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता हे उद्दिष्ट पूर्ण होईल काय? अशी शंका येते या कामाची सुरुवातच चुकीच्या पद्धतीने झाल्याने गावांना अद्याप पाणी मिळाले नाही. एका संस्थेकडे शंभर- शंभर कोटी रुपयांची कामे दिल्याने ही कामे पूर्ण होणार कशी असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे?

# भगवान बाबा प्रतिष्ठानच्या राष्ट्रीय एकात्मता सप्ताहाला २८ वर्षाची परंपरा

## गुरुवारी होणार सर्वधर्मसमभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोडवर असलेल्या श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान मध्ये गेल्या २८ वर्षापासून सर्वधर्मसमभाव राष्ट्रीय एकात्मता व अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. या सप्ताहाचे हे २९ वे वर्ष असून अखंड भारतातील सामाजिक सलोखा टिकून रहावा सर्व धर्मामध्ये एकमेकाविषयी प्रेम आणी आदर असावा .या उदात्त हेतूने या सप्ताहाची सुरुवात झालेली आहे. आज हा सप्ताह अखंडपणे २८ वर्षे चालू आहे. यावर्षी २९ वे वर्षे असून हा सप्ताह गुरुवारी प्रारंभ झाला. या सप्ताहाची सांगता गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. महादेव महाराज राऊत यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून या सप्ताहाला उपस्थित राहण्याचे आवाहन संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान मध्ये गुरुवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी या सप्ताहास प्रारंभ झाला. यानिमित्त भजन, कीर्तन, प्रवचन, हरिपाठ ,आदी कार्यक्रम दररोज होतात. गुरुवारी ह. भ. प. मोहन महाराज खरमाटे यांचे प्रवचन तर महंत गणेशानंद महाराज शास्त्री यांचे कीर्तन झाले. शुक्रवारी ह .भ. प. माधव महाराज डाके यांचे प्रवचन तर ह .भ. प. महादेव महाराज चाकरवाडी कर यांचे कीर्तन झाले. शनिवारी ह. भ. प .बापुराव महाराज मुंडे यांचे प्रवचन तर ह. भ. प. कृष्णानंद महाराज मुंडे यांचे कीर्तन झाले. रविवारी प्राचार्य परशुराम मराडे सर यांचे प्रवचन तर सायंकाळी स्वररत्न ह. भ. प. अंजलीताई केंद्रे यांचे कीर्तन झाले. आज सोमवारी ह. भ. प. डॉ. भागवत मोटे महाराज व ह. भ. प. उषाताई मुंडे महाराज यांचे प्रवचन तर ह. भ. प. पांडुरंग महाराज जाधव गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवारी ह.भ.प. श्रीमंत महाराज तांदळे व ह .भ .प. बद्रीनाथ महाराज यांचे प्रवचन तर ह. भ. प .नवनाथ महाराज शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे .बुधवारी महामंडलेश्वर स्वामी शिवरुद्रानंद यांचे प्रवचन तर त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज यांचे कीर्तन होणार आहे .गुरुवारी या सप्ताहाची सांगता होत असून सकाळी ११ ते १ दरम्यान ह. भ. प. महादेव महाराज राऊत जवळेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना भाविक भक्तांनी आणि सर्व धर्मसमभावावर विश्वास असणाऱ्या नागरिकांनी उपस्थिती दर्शवावी असे आवाहन संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# गुजरवाडी येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गुजरवाडी येथे शिवजन्मोत्सव २०२५ व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आनंदऋषीजी नेत्रालय, अहमदनगर तसेच बळीराजा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त लवकरच ज्यांना गरज असेल त्यांना या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आनंदऋषीजी नेत्रालय, अहमदनगर या ठिकाणी पाठवण्यात येणार आहे.या



विद्यमाने शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी शनिवार रोजी मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले.या शिबिरामध्ये आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर,माजलगाव येथील नेत्र रोग चिकित्सक डॉक्टरांनी परिसरातील जवळपास १०० गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी केली.

शिबिराचे आयोजन समाजकार्यात नेहमीच अग्रेसर असणारे व शेती प्रश्नांचे अभ्यासक प्रा.बालासाहेब येवले यांनी केले होते.या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी मौजे गुजरवाडी ग्रामस्थांची ही मोठ्या प्रमाणावर साथ लाभली.





# मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया अध्यक्षपदी तपसे तर सचिवपदी प्रकाश मुंडे

बीड । प्रतिनिधी

केज तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया पत्रकार परिषदेच्या केज तालुका अध्यक्ष पदी रामदास तपसे तर सचिवपदी प्रकाश मुंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मराठी पत्रकार परिषदेच्या विश्वस्त एस. एम. देशमुख सर, डिजिटल मीडिया राज्यकार्याध्यक्ष अनिल वाघमारे, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे सर यांच्या सूचनेनुसार केज येथे सक्रिय पत्रकार संघाच्या कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीला तालुका मराठी पत्रकार परिषदेचे केज तालुका अध्यक्ष तालुकाध्यक्ष विजय आरकडे ,जिल्हा उपाध्यक्ष गौतम बापु बचुटे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे सुहास चितद्रवार ,दशरथ चौरे व डि.डी.बनसोडे बापू यांच्या उपस्थितीत सदरील बैठक पार पडली. यावेळी सर्वानुमते मुद्देसूद चर्चा करून पुढील कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष रामदास तपसे,सचिव प्रकाश मुंडे, उपाध्यक्ष अजय भांगे,संघटक सन्नी शेख तर कार्याध्यक्षपदी इक्बाल शेख व मार्गदर्शक म्हणून राजेभाऊ कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. सदरील बैठकीला संतोष गालफाडे,रमेश गुळभुले, महादेव गायकवाड, नंदकुमार मोरे,मुब्बशीर खतीब व इतर मान्यवर पत्रकार बांधव उपस्थित होते. अखिल भारतीय स्तरावर पत्रकारांच्या नया हक्कासाठी लढा देणाऱ्या मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया पत्रकार परिषदेच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# समीर शेख राज्यस्तरीय मौलाना अबुल कलाम आझाद समाज सेवा पुरस्काराने सन्मानित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण समीर शेख यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे, त्यासोबत दांडगा राजकिय संपर्क असलेले व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरिबांचा आवाज न्यायव्यवस्थेपर्यंत पोहचवत, प्रश्न मार्गी लावणारे, विविध सामाजिक उपक्रम घेऊन सर्वधर्मसमभाव संदेश देत आहेत, सर्व धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते, सुरेश (आण्णा) धस यांचे स्वीय सहाय्यक समीर बादशहा शेख यांच्या सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्यची दखल घेत सन



२०२४-२५ या वर्षाचा राज्यस्तरीय मौलाना अबुल कलाम आझाद समाज सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.. या आगोधर सन २०२२-२३ मध्ये यशवंतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते.

दैनिक दिव्य वार्ता आणि साप्ता.कश्मकशच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त गोरगरीब महिलांना शिलाई मशीन व गोरगरीब विद्यार्थ्यांना सायकल वाटप तसेच समाजातील विविध घटकांतील नागरीकांनसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार वितरण सोहळा सोहळा आयोजन करण्यात आले होते . यावेळी वक्फ बोर्डाचे चेअरमन मा.समीर काजी,विधान परिषदेचे आमदार मा.इद्रीश नाईकवडी , मा.आ सिराज देशमुख, मा.आ.राजेंद्र जगताप,शफीक भाऊ, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष मा.सलीम जहांगीर, यशराज पंडित,दैनिक दिव्या वार्ता/ साप्ता.कश्मकश चे संपादक अबुबकर चाऊस, लोकशा संपादक विजय बंब , लोकप्रभा संपादक संतोष मानुरकर, दैनिक वास्तव संपादक जितेंद्र सिरसाठ, सिटीजन कार्यकारी कार्यकारी संपादक चंदन पठाण लोकमित्रचे संपादक हमीदखान पठाण, कासम शेख ,जावेद शेख, सोमीनाथ कोल्हे, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे विविध क्षेत्रातून समीर शेख यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे..

# आष्टीत रक्तदान शिबिराचे आयोजन १३० तरूण रक्तादात्यांनी केले रक्तदान

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये आज काही प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी राखत व तरुणांना रक्तदानाविषयी माहिती मिळावी हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून युवा नेते तथा जामगावचे सरपंच राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात १३०



रक्तदात्यांनी रक्तदान केले.या मध्ये मोठ्या प्रमाणात तरूणांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे.

आष्टी येथील पंचायत समितीच्या प्रांगणात आयोजित युवा नेते तथा जामगावचे सरपंच राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीराला तरूणांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला.रक्तदाते यांना माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस, युवा नेते राधेश्याम भैय्या धस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी राधेश्याम भैय्या धस मित्र परिवार व नगर येथील सुरभी रक्त पेढीचे डॉ राजेंद्र पवार व विकास जरे, राहुल जरे,शिवम खिल्लारे, सोनिया शितोळे, वैष्णवी भोईटे, दिपाली वाळके, आदित्य जगताप, भावना म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.

# महिलेच्या घरावर हल्ला,जातीय सलोखा बिघडवण्याचा संशय!

## अज्ञात आरोपीचा शोध लावून कारवाई करा–गंगाधर काळकुटे

बीड । प्रतिनिधी

शहरातील संभाजीनगर भागात राहणाऱ्या एका कुटुंबीयावर रात्री हल्ला करून तुम्ही ताफ्याला आडवे का आलात असे म्हणत महिलेस मारहाण केल्याची घटना घडली होती प्रामुख्याने मराठा आणि ओबीसी या समाजातील जातीय सलोखा बिघडवण्यासाठी कोणीतरी हे मुद्दामून केल्या असल्याचा आमचा संशय असून पोलिसांनी हे आरोपी शोधून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी मराठा आरक्षण



आंदोलनाचे समनव्यक व छावा संघटनेचे अध्यक्ष मराठा सेवक गंगाधर काळकुटे यांनी आज पोलीस अधीक्षक बीड यांना शिवाजीनगर पोलिसांच्या माध्यमातून निवेदन देऊन वरील मागणी केली

पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात गंगाधर काळकुटे यांनी म्हटले आहे की कचारवाडी तालुका जिल्हा बीड येथे मनोज ◀◀ पान ३ वर

# सिरसाळा भूषण पुरस्कारासाठी १० मार्चपर्यंत प्रवेशिका पाठवा- उबाळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सिरसाळा येथील जनकल्याण शैक्षणिक सेवाभावी संस्था व यशराज पब्लिक स्कुलच्या वतीने २२ मार्च २०२५ रोजी ‘‘सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५‘‘ देण्यात येणार असून या पुरस्कारासाठी १० मार्च २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन श्री. जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष, जनकल्याण बुउद्देशिय सेवाभावी संस्था वाघाळा यांनी केले आहे.



सिरसाळा व पंचक्रोशी मधे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय व अतुलनीय निस्वार्थी भरीवपणें कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन मागील काही वर्षा पासून जनकल्याण बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था वाघाळा व यशराज पब्लिक स्कुलच्या वतीने सामाजिक /शैक्षणिक /सांस्कृतिक /सेवा / आरोग्य सेवा /राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस ‘‘सिरसाळा भूषण पुरस्कार‘‘ देण्यात येत असून या वर्षी देण्यात येणाऱ्या ‘‘सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५‘‘ साठी संस्थेच्या वतीने प्रवेशिका ◀◀ पान ३ वर



उदगीर तालुका पत्रकार संघाकडून शोधवार्ता गटात दिल्या जाणाऱ्या मराठवाडास्तरीय प्रथम पुरस्काराने शनिवारी (दि.२२) उदगीर (जिल्हा लातूर) येथे लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे व राज्याचे मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री आ. संजयजी बन्सोडे, लातूर विभागाचे माहिती व जनसंपर्क विभागाचे सहाय्यक संचालक श्याम टरके, उदगीर पत्रकार संघाचे अध्यक्ष राम मोतीपवळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विधानसभेच्या यशात इव्हीएम नव्हे तर महाविकास आघाडी दोषी-आठवले

**पिंपरी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीच्या बजुने कौल दिला आहे. लोकसभेत राज्यात महाविकास आघाडीला संवधिान बदलण्याच्या अफवेमुळे अधिक जागा मिळाल्या. मात्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३७ जागा जिंकल्या. या निवडणुकीतील यशाला इव्हीएम न्हे तर महाविकास आघाडी दोषी असल्याची टिका केंद्रीय सामाजिक व न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

चिंचवडमधील अजंठानगर एसआरए प्रकल्पाचे भुमीपूजन आठवले यांच्या हस्ते शनिवारी (दि. २२) झाले. यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी आमदार अण्णा बनसोडे, रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत, प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, इलाताई ठोसर, माजी नगरसेवक अंकुश कानडी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी आठवले म्हणाले, विधानसभा निवडणुकीपुर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना लागू केल्याने या योजनेचा फायदा महायुतीला झाला. तसेच लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी पसरविलेली संविधान बदलण्याची अफवा जनतेच्या लक्षात आल्याने महायुतीला विधानसभा निवडणुकीत २३७ जागा मिळाल्या.परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या दलित तरूणाचा पोलीसांच्या मारहाणीत मृत्यू झाला आहे. मात्र अद्यापही कोणावर गुन्हा दाखल झालेला नाही. वास्तविक पाहता याठिकाणी झालेल्या संविधान प्रास्ताविकाच्या अपमानाचा पोलिसांना राग आला पाहिजे होता. मात्र, या घटनेविरोधात आंदोलन करणार्या नागरिकांना पोलिसांनी मारहाण केली. त्यामुळे या खूनप्रकरणात दोषी असलेल्या पोलिसांवर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

तसेच भोरमध्ये विक्रम गायकवाड या तरुणाचा जातीयवादातून झालेल्या खुनप्रकरणातील फरारी आरोपींना पोलिसांनी तत्काळ अटक करावी, असे सांगत आज आपण कोठे चाललो आहे. संविधानाने अस्पृश्यता संपविली असली, तरी जातीवादातून खुन होत आहे. याबाबत मी मुख्यमंत्री देवेमद्र फडणवसि यांची भेट घेणारअ ाहे, असे म्हणत, देशाला मजबूत करण्यासाठी दोन्ही समाजातील नागरिकांनी एकत्र येण्याची गरज असल्याची अपेक्षा आठवले यांनी यावेळी व्यक्त केली.

अजंठानगरमधील एसआरए प्रकल्पाबाबत आठवले म्हणाले, शरद पवार यांच्या मंत्रीमंडळात असताना मी झोपडपट्टीधारकांना घर मिळण्याची मागणी केली होती. आता या प्रकल्पात ३०० चा. फुटांचे घर मिळत आहे. याक्षेत्रफळात वाढ करून ते ४५० चौ. फुट करावे, अशी आमची राज्य सरकारकडे मागणी असून, त्यामुळे लाभार्थ्यांना व बांधकाम व्यावसायिकालादेखील फायदा होऊ शकतो.

# मुस्लिम व्यावसायिकांना ३ कोटींचे कर्ज मंजूर; दत्तात्रय भरणेंच्या हस्ते कर्ज मंजुरी पत्रांचे वाटप

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील १०० छोट्या व्यावसायिकांना मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून प्रत्येकी तीन लाखांचे कर्ज मंजूर झाले आहे. अल्पसंख्याकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कर्ज मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले.

भरणेवाडी (ता. इंदापूर) येथे शनिवारी (दि. २२) कर्ज मंजुरी पत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुस्ताक अंतुले, सलीम सारंग, गफार सय्यद, डॉ. शशिकांत तरंगे, युवराज म्हस्के, हनुमंत कोकाटे, आनंद चंदनशिवे, सचिन सपकाळ, अमोल पाटील, अतुल झगडे, शुभम निंबाळकर, रियाज शेख, अजीज मुलाणी, शब्बीर काझी, फिरोज पठाण आदी मान्यवर उपस्थित होते.



या वेळी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, माझ्या गोरगरीब मुस्लिम बांधवांना आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची माहिती मिळावी यासाठी हा कार्यक्रम घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस व महायुती सरकार अल्पसंख्याक समाजासोबत आहे. मुस्लिम समाजातील येणारी पिढी शिक्षणाकडे वळावी यासाठी आपण प्रयत्न करणार आहे. हिंदू – मुस्लिम भाई-भाई आहेत, हीच भावना वाढीस लागावी म्हणून आपण इंदापूर येथील मालोजीराजे गढीसोबतच चांदवली बाबा दर्गाहचे काम मंजूर केले आहे.

या वेळी मुस्ताक अंतुले म्हणाले, मंत्री भरणे यांनी आजवर मुस्लिम बांधवांचा सर्वतोपरी विकास साधला आहे. पश्चिम महाराष्ट्राला भरणे हे सावलीप्रमाणे आहेत. इंदापूर तालुक्यात यापूर्वीच्या लोकप्रतिनिधींकडून मुस्लिम समाजाची तुंबलेली कामे त्यांच्या माध्यमातून नक्कीच मार्गी लागतील असा विश्वास व्यक्त केला. मंत्री भरणे यांनी मौलाना आझाद महामंडळाचे भागभांडवल ७०० कोटींवरून १ हजार कोटी करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगून येणार्या काळात मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणे व उच्च शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्री भरणे विचार करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# कर भरून कारवाई टाळा-भोसले

**चाकण । प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या मालमत्ता व पाणीपट्टी कराचा वेळेवर भरणा करून नगर परिषदेस सहकार्य करावे, तसेच कारवाई टाळावी, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत भोसले यांनी केले आहे.

मार्च महिना जवळ येत असल्याने चाकण नगर परिषदेच्या वतीने मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या २०२४ - २५ या आर्थिक वर्षासाठी थकीत कराच्या वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम अभियान राबविण्यात येत आहे. मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या वसुलीसाठी नगर परिषदेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांचे पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाद्वारे विशेष वसुली मोहीम अभियानांतर्गत थकबाकीदारांचे नळ जोड तोडणे, मालमत्ता जप्ती, थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे, तसेच शहरातील विविध भागांत थकबाकीदारांच्या नावांचे फलक लावणे अशा प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्याकडे असलेल्या मालमत्ता व पाणीपट्टी कराचा वेळेत भरणा करून संभाव्य कारवाई टाळण्याचे आवाहन मुख्याधिकारी चंद्रकांत भोसले यांनी केले आहे.


सुट्टीच्या दिवशीही वसुली विभाग सुरू

नागरिकांना मालमत्ता व पाणीपट्टी कराचा भरणा करण्यासाठी शनिवार, रविवारसह इतर सुट्टीच्या दिवशीसुद्धा नगर परिषदेचे वसुली विभागाचे कार्यालय सुरू ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन कराचा वेळेत भरणा करण्याचे आवाहन मुख्याधिकारी चंद्रकांत भोसले यांनी केले आहे.

# महामार्ग प्राधिकरण कार्यालयातील साहित्य जप्त;जिल्हा न्यायालयाचा आदेश

**मंचर । प्रतिनिधी**

पुणे – नाशिक महामार्गाच्या बायपाससाठी भूसंपादन झालेल्या निघोटवाडी (ता. आंबेगाव) येथील महिलेला वाढीव मोबदला देण्यास टाळाटाळ केल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संचालकांची वारजे, पुणे येथील कार्यालयातील खुर्ची आणि साहित्य न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त करण्यात आले. ॲड. पल्लवी पोतनीस यांनी ही माहिती दिली.



पुणे– नाशिक महामार्गासाठी निघोटवाडीतील जवळपास १०० शेतकर्यांच्या जमिनीचे संपादन करण्यात आले. या बदल्यात शेतकर्यांना मिळालेला मोबदला अल्प असल्याने सीमा सुदाम लेंडवे (रा. निघोटवाडी) यांनी जिल्हा न्यायालयात वाढीव भरपाईसाठी दावा दाखल केला. त्याचा निकाल ३० ऑगस्ट २०२२ रोजी लागला.

शेतजमीन हे लेंडवे यांच्या उपजीविकेचे एकमेव साधन होते. त्यामुळे जास्तीची नुकसानभरपाई मिळावी यासाठी त्यांनी ॲड. पोतनीस यांच्यामार्फत दावा दाखल केला होता. त्याचा निकाल लेंडवे यांच्या बाजूने लागला. त्यांना १ कोटी ३९ लाख ८४ हजार रुपये वाढीव मोबदला म्हणून देण्याचा आदेश न्यायालयाने दिला. परंतु, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी साहित्य जप्तीची अंमलबजावणी करण्याचा आदेश २३ ऑक्टोबर २०२४ रोजी दिला.

न्यायालयाचे बेलिफ यांनी लेंडवे यांच्यासमवेत राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयात शुक्रवारी (दि. २१) जाऊन वॉरन्ट बजावले. या वेळी अधिकार्यांनी पैसे लवकरात लवकर न्यायालयात जमा करू असे मोघम आश्वासन दिले. मात्र, राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी न्यायालयात पैसे भरायला तसेच चेक देण्यासाठी तयार नसल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार कायार्लयातील खुर्च्या, संगणक आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले.

# कर्मचार्‍याला मारहाण करणार्‍या सरपंचावर गुन्हा

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

जातेगाव बुद्रुक (ता. शिरूर) येथील सरपंच नीलेश संपत उमाप यांनी पाणीपुरवठ्याचे काम करणार्या एका ग्रामपंचायत कर्मचार्याला मारहाण केली. याबाबत कर्मचारी प्रकाश कोंडीबा डहाळे याने शिक्रापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सरपंच उमाप यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल केला.

या बाबतची माहिती अशी ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश डहाळे हे जातेगाव बुद्रुक येथे ग्रामपंचायतमध्ये पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून काम करतात. सरपंच उमाप यांनी त्यांना जिल्हा परिषद शाळेसमोर बोलावून घेतले. कामाबाबत लोकांच्या तक्रारी असल्याचे सांगत सुरू असलेल्या एका बांधकामाला पाणी मारण्यास सांगितले. जेवण करून आल्यावर पाणी मारतो, असे डहाळे यांनी सांगितल्याने संतप्त झालेल्या सरपंच उमाप यांनी डहाळे यास मारहाण केली. सरपंचांनी कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली असून, कामावर येऊ देत नसल्याचा आरोप डहाळे याने केला आहे. याबाबत सरपंच उमाप यांनी असा कोणताही प्रकार घडला नसून, संबंधित कर्मचारी कामात कामचुकारपणा करत आहे. पाणी सोडण्याबाबत अनेक तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. याबाबत त्याला जाब विचारला होता. तर ग्रामपंचायत अधिकारी चेतन वाव्हळ यांनी सांगितले की सदर कर्मचार्याला काढून टाकण्याबाबत कोणतीही कारवाई केलेली नाही.

# होळीसाठी धावणार पुणे-नागपूर विशेष रेल्वे

**पुणे । प्रतिनिधी**

होळीसाठी गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. प्रवाशांची सोय व्हावी, या हेतूने रेल्वे प्रशासनाने २८ विशेष रेल्वे सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यात पुणे – नागपूरचा देखील समावेश आहे. पुणे ते नागपूर दरम्यान विशेष रेल्वेच्या आठ फेऱ्या होणार आहेत.



पुणे – नागपूर – पुणे साप्ताहिक विशेष रेल्वे क्रमांक ०१४६९ ही ११ व १८ मार्च रोजी पुण्याहून दुपारी तीन वाजून ५० मिनिटांनी सुटेल. नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजून ३० मिनिटांनी पोहोचेल. ०१४७० ही रेल्वे नागपूर हून १२ व १९ मार्चला सकाळी आठ वाजता सुटेल. पुण्याला त्याच दिवशी रात्री साडेअकरा वाजता पोहोचेल.

विशेष रेल्वे क्रमांक ०१४६७ पुण्याहून १२ व १९ मार्चला दुपारी तीन वाजून ५० मिनिटांनी सुटेल. नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजून ३० मिनिटांनी पोहोचेल. विशेष रेल्वे क्रमांक ०१४६८ नागपूर हून १३ व २० मार्चला सकाळी आठ वाजता सुटेल, पुण्याला त्याच रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी पोहोचेल.

# टँकरच्या धडकेत पादचारी महिलेचा मृत्यू

**वाघोली । प्रतिनिधी**

कचरा वेचणारी महिला पायी चालत जात असताना पाण्याच्या टँकरने महिलेला धडक दिल्याने महिला गंभीर जखमी होऊन तिचा मृत्यू झाल्याची घटना वाघोली येथील केसनंद फाटा येथे शनिवारी (दि. २२) सकाळी सव्वा सातच्या सुमारास घडली.

राधिका कृष्णा सोनवणे (वय ५२, रा. येरवडा) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी चालक अजय ज्ञानेश्वर धोत्रे (रा. वाघोली) व मालक गणेश तांबे (रा. भावडी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सोनवणे या पायी जात असताना नगर रोडवर केसनंद फाट्यावरील गोकुळ स्वीट होम समोर पाण्याच्या टँकरने त्यांना धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान सोनवणे यांना मृत घोषित करण्यात आले.

चालक धोत्रे यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसताना वाहन चालवून अपघात केल्याने धोत्रे याच्यावर तसेच वाहन परवाना नसताना तसेच वाहनाचा विमा नूतनीकरण नसताना चालकाला वाहन चालविण्यासाठी प्रोत्साहान दिल्याने मालक तांबे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शरद भाकरे यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास वाघोली पोलीस करीत आहेत.

# भाजप पुणे जिल्हा युवा मोर्चाच्या कार्यकारी अध्यक्षपदी गणेश कवडे यांची नियुक्ती

**ओझर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या पुणे जिल्हा युवा मोर्चाच्या कार्यकारी अध्यक्षपदी गणेश कवडे यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीचे पत्र भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते गणेश कवडे यांना नुकतेच प्रदान करण्यात आले.



या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेश महामंत्री आमदार विक्रांत पाटील, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चाचे अध्यक्ष अनुप मोरे, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप, भाजपा जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, भाजपा नेत्या व विधानसभा प्रमुख आशा बुचके, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, जिल्हा सरचिटणीस ताराचंद कराळे, जिल्हा सरचिटणीस संजू रौंदळ, जिल्हा सरचिटणीस आशिष माळवदकर, उपजिल्हाध्यक्ष भगवानराव घोलप, तालुकाध्यक्ष संतोष खैरे, डॉ. पंजाब कथे, दिलीप गांजळे आदी मान्यवर उपस्थित होते.

गणेश कवडे म्हणाले, माझ्यासारख्या एका सामान्य युवकाला ही संधी दिल्याबद्दल मी सर्व वरिष्ठांचे अत्यंत आदरपूर्वक आभार मानतो. भारतीय जनता पक्षाचे ब्रीदवाक्य 'प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष, शेवटी स्वतः' याप्रमाणे मी कार्य करेन, अशी ग्वाही सर्वांना देतो. माझ्या कार्यक्षेत्रात युवा मोर्चाचे संघटन आणखी बळकट करण्यासाठी आणि भारतीय जनता पक्षाचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी मी सर्वांच्या सहकार्याने काम करेन. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचत आहे, तसेच आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र ही विकासाच्या दिशेने मोठ्या पावले टाकत आहे. अशा स्थितीत पक्षाने माझ्यासारख्या सर्वसामान्य घरातून आलेल्या युवकावर जो विश्वास दाखवला आहे, तो मी निश्चितच सार्थ करून दाखवीन.

# नोंदणी नसलेले आरओ प्लांट बंद करणार; महापालिकेची नवीन नियमावली

**पिंपरी । प्रतिनिधी**

शहरातील खासगी आरओ प्लांटचालकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे रीतसर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे अर्ज करावा. नोंदणी नसलेल्या आरओ प्लांटवर कारवाई केली जाणार आहे.

जीबीएस आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील खासगी आरओ प्लांट आणि वॉटर एटीएमची तपासणी केली. त्यात ते पाणी दूषित असल्याचे आढळून आले.

त्यामुळे आरओ प्लांट व वॉटर एटीमएम बंद करण्यात आले होते. एफडीओकडून या प्लांटवर कारवाई केली जात नसल्याने महापालिकेने त्यासंदर्भात नवीन निमावली तयार केली आहे. त्याला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शनिवारी (दि.२२) मान्यता दिली आहे.

शहरात आरओ प्लांट व वॉटर एटीएम चालविण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. खासगी आरओ प्लांट मालक किंवा चालकांनी तातडीने त्यांच्या मूळ उत्पादक कंपनीकडून किंवा प्लांट दुरुस्त करणारी संस्थाकडून संपूर्ण



आरओ प्लांटची देखभाल व दुरुस्ती करून घेऊन त्याबाबतचा प्रत्येक ६ महिन्यांनी तसा दाखला संबंधित कंपनीकडून घ्यावा. देखभाल व दुरुस्तीचे प्रत्यक्ष काम सुरू असतानाचे सुस्पष्ट, तारीख, वेळ व जियो टॅगसह छायाचित्र काढावेत.

मुख्य उत्पादक कंपनी किंवा प्लांट देखभाल-दुरुस्ती करणारी संस्था यांच्याकडून त्या प्लांटच्या आउटलेटचे पाणी मानक, आयएस १०५०० (२०१२) व डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शुद्धीकरण करण्यासाठी प्लांट योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याचा दाखला सादर करावा.

पुण्यातील राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रयोगशाळेकडून आरओ प्लांटद्वारे येणारे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत दर महिन्याला स्रोतामधील पाणी व शुद्ध केलेले पाणी यांची गुणवत्ता तपासणी करावी. टेस्ट रिपोर्ट त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावा. संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे सादर करावा. आरओ प्लांटसाठी महापालिकेचे पाणी वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. तो नळजोड अनधिकृत असल्यास अधिकृत करून घ्यावा. बिगर घरगुती दराने मीटरनुसार त्या पाण्याचे बिल महापालिकेकडे भरावे. तसे न केल्यास नळजोड आणि आरओ प्लांट कायमस्वरूपी बंद केले जाईल, असे नियमावलीत नमूद केले आहे.

# नागेश्वर मंदिरात रुद्रयाग विधी सोहळा; सुनेत्रा पवारांच्या हस्ते ११ किलो चांदीचा मुखवटा अर्पण करणार

**माळेगाव । प्रतिनिधी**

बुद्रुक येथे बुधवार (दि २६ फेब्रुवारी) सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत रुद्रयाग विधी होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता तालिका अध्यक्ष व राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांच्या शुभहस्ते नागेश्वर लिंगावर चांदीच्या मुखवटचाची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती नागेश्वर विकास प्रतिष्ठान तर्फे प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिपक तावरे व उपाध्यक्ष संग्रामसिंह तावरे यांनी दिली.



यावेळी बोलताना दिपक तावरे म्हणाले की, याग म्हणजे विशिष्ट देवतेला आव्हान करून त्या देवतेच्या पूजनासह इतर देवता म्हणजे उपदेवतांचे पूजनासह होम हवनात्मक कर्म करणे, हे माळेगावमधील गावकऱ्यांसाठी रुद्रयागाचे आयोजन करण्याचा उद्देश आहे. रुद्र यागात शिव ही मुख्य देवता असते. रुद्रयाग करताना त्यामध्ये सर्वप्रथम पुण्यहवाचन पूजा करून त्यामध्ये संकल्प केला जाणार आहे. या संकल्पामध्ये आपण आपली इच्छा पूर्ण होण्याचा उच्चार करतो. रुद्रयाग हा संपूर्ण गावाचे तसेच यज्ञास उपस्थित असणाऱ्या समस्त बंधू-भगिनींचे कल्याण व्हावे,तसेच आपल्या माळेगावावर कोणती आपत्ती येऊ नये, आलेल्या संकटांचे निवारण होऊन सर्वांना गावकरी, नागरीक, बालक यांना सुख -शांती लाभावी यासाठी केला जाणार आहे,

तसेच मनुष्याला विविध ग्रहपिडा, ज्वरपिडा असतात. या सर्व पिडांचा, बाधांचा नाश होऊन सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी रुद्रयाग केला जाणार आहे. याशिवाय सर्वांना संततीसुख लाभून वंश वाढवा. तसेच वंशावर कोणते अरिष्ट असेल तर ते दूर व्हावे यासाठी रुद्रयाग केला जाणार आहे. असे वेगवेगळ्या ऐहिक सुखांची प्राप्ती व्हावी यासाठी रुद्र यागाचे आयोजन नागेश्वर मंदिर माळेगाव बुद्रुक केले जाणार आहे. माळेगाव बुद्रुक व परिसरातील सर्व भक्तांनी रुद्रयागावेळी उपस्थित राहून सेवा करण्याची संधी घ्यावी, असे आव्हान नागेश्वर विकास प्रतिष्ठान तर्फे अध्यक्ष दिपक तावरे व उपाध्यक्ष संग्रामसिंह तावरे व विश्वस्त मंडळाने केले. दरम्यान, महाशिवरात्री दिवशी नागेश्वर मंदिर येथे मोठा उत्सव भरतो, यासाठी भाविकांसाठी विविध सोयी सुविधा करण्यात आल्या आहेत. गुरुवार दिनांक २७ रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे